# माणूस

बुधवार । १७ मार्च १९७१ । चाळीस पैसे

काँग्रेसचा व देशाचा जो अस्वस्थ मूड होता त्याच्याशी श्रीमती गांधींनी एकप्रकारचा नाट्यमय व नेकदार असा सुसंवाद साधला, या मूडचे स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात प्रतिनिधित्व केले व एका बेहोशीत काही पावले त्या चालल्या....

– चंद्रशेखर

बुधवार १७ मार्च १९७१

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : सत्तरावा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

किंमत
चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी
तीस रुपये

परदेशची वर्गणी
साठ रुपये

## प्रेम नमस्कार..

□ माणूसमध्ये निवडणुकीपूर्वी काही दिवस येत असलेल्या जाहीरनाम्या-बद्दल हार्दिक अभिनंदन.

आपल्या २४ फेब्रुवारीच्या अंकातील 'एक फुलाच्या' फडतूस 'गोष्टींच्या' पार्श्वभूमीवर 'गौतम बुद्धाचा स्पर्श' आनंदाचे रोमांच उठविणारा वाटला. कित्येक महिने अशी दर्जेदार कथा माणूसमध्ये वाचली नव्हती. राज-कारणाबरोबरच याही क्षेत्रात दर्जेदार साहित्य द्याल अशी आशा आहे.

२ मार्च, ७१ नंदकुमार मोहिते,
मुंबई

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक,

नवकाँग्रेस विजयाचा अन्वयार्थ....एक प्रतिक्रिया

# निवडणुकीतील धुके आणि धक्के

चंद्रशेखर

‘मूर्ख भांडवलशाही दलाल आणि सिंडिकेट आपल्या केविलवाण्या चाळ्यांनी इंदिराजींची लोकप्रियता वाढवीत आहेत ...’
सुमारे दोन वर्षांपूर्वी (माणूस, १५ ऑगस्ट १९६९ अंक) या शब्दात आपल्या ‘दिल्ली दिनांक’ लेखाचा ‘चंद्रशेखर’ यांनी शेवट केला होता...

‘निवडणुक’ या शब्दांत कांहीतरी जादु असावी असं मला वाटू लागले आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सुरू झालेलं आघाड्यांचे राजकारण, वारंवार कोसळणारी सरकारे, १९६९ मध्ये उडालेलो काँग्रेसच्या दुफळीचो वावटळ आणि त्यानंतर काँग्रेसच्या दोन्हो शकलांनी केलेली (देवस्थानच्या ट्रस्टींसारखी) अमर्याद कोर्टबाजी या व अशा अनेक कारणांमुळे मी राजकीय बातम्या वाचण्याचे सोडूनच दिले होते. सुशिक्षित मध्यमवर्गही राजकारण व राजकारणी या विषयी दिवसेंदिवस अधिकाधिक सिनिक होत चालला होता. ‘सगळे सारखेच, आपण बरे की आपले काम बरे’ हा जनतेचा मूड कालपरवापर्यंत होता.

परतु मध्यावधि निवडणुकांची घोषणा झाली व हे चित्र झपाट्याने पालटले. वातावरणातील ‘राजकीयपणा’ दिसामासाने वाढत जाऊन परवा निकालाच्या दिवशी तर सगळीच मंडळी तात्पुरती राजकारणी बनली. वर्षानुवर्षे ऑफिस कामापलिकडे विचार न करणाऱ्या ‘बाबू’ लोकांनी देखील चक्क शंभर शंभर रुपयांच्या पैजा मारल्या.

आणि निवडणुकीनेही लोकांची निराशा केली नाही. अशा अर्थी की याहि वेळी निवडणुक निकाल ‘धक्कादायक’ होते. हे आपल्या निवडणुकांचे नवीनच स्वरूप आहे. १९५२ पासून १९६२ च्या निवडणुकांपर्यंत धक्कादायक असे काहीच नसायचे. ‘काँग्रेस येणार’ असे सगळे लोक धरूनच चालावयाचे आणि त्याप्रमाणेच घडावयाचे. १९५७ साली महाराष्ट्रात काँग्रेसचा मोठा पराभव झाला हे खरे पण त्यावेळी महाराष्ट्रीय जनता हे अपेक्षितच होती. निवडणूक हा १९६२ पर्यंत एक उपचार होता.

पण त्यानंतर भारतीय जनमानसात काही तरी ‘रासायनिक’ प्रक्रिया होऊ लागली. १९६५ चे पाकिस्तानबरोबरचे युद्ध जिंकल्याने १९६७ मध्ये काँग्रेस

विजयी व्हावयाची पण–

१९६७ चा हा जो 'पण' आहे त्याने देशांत इतिहास घडवला. पंडित नेहरूंनी एके ठिकाणी म्हटले आहे की, इतिहासात अशी एक प्रवृत्ति आहे की तो कधी कधी फार वेगाने घडतो तर कधी कधी रेंगाळत रेंगाळत जातो. १९६७ ते १९७१ या चार वर्षांच्या काळात भारतीय इतिहासाने जेवढी पावले टाकली तेवढी स्वातंत्र्य-काळातील त्यापूर्वीच्या वीस वर्षांत टाकली नव्हती.

१९६७ साली काँग्रेसची जबरदस्त पीछेहाट झाल्याबद्दल लोकांना आश्चर्याचा धक्का बसला तर १९७१ साली काँग्रेसचा प्रचंड विजय झाल्याने तेवढाच आश्चर्याचा धक्का बसला. भारतीय निवडणुका अधिकाधिक अगम्य होत चालल्या आहेत एवढाच स्थूल निष्कर्ष प्रथमदर्शनी काढता येतो.

११ मार्च १९७१ हा दिवस भारताच्या प्रदीर्घ इतिहासात निर्णायक महत्त्वाचा ठरणार आहे. स्वातंत्र्य प्राप्तिपासून, अंतर्विरोधाने जर्जर झालेला, सत्तास्थानी दीर्घकाळ राहून बोजड बनलेला, नानाप्रकारच्या विचारप्रणालींच्या नेत्यांनी बजबजलेला काँग्रेस पक्ष या दिवशी कायाकल्पाच्या अद्भुत किमयेने पुन्हा एकदा तरुण व एकसंध व्यक्तिमत्त्वाचा असा झाला, ही या मध्यावधि निवडणुकीची पहिली निष्पत्ति होय.

आणि दुसरी तितकीच महत्त्वाची आणि थोडीशी धक्का देणारी गोष्ट म्हणजे काँग्रेस पक्षाला भारतीय जनतेने निर्विवाद राज्याधिकार देऊन विरोधकांना अत्यंत स्पष्टपणे नाकारले आहे.

या दोन्ही बाबी फार वेगवेगळ्या आहेत. १९६७ साली ज्या देशात सात प्रांतांमध्ये विरोधी पक्षांचे राज्य मतपेटीच्या कौलानुसार अस्तित्वात आले त्याच देशात अवघ्या चार वर्षांत पुन्हा काँग्रेस पक्षाच्या हातात सत्ता येते ही गोष्ट भारतीय मतदाराच्या तारतम्य बुद्धीचे द्योतक आहे. हा कौल चांगला की वाईट हा प्रश्न लोकशाही राज्यव्यवस्थेच्या संदर्भात गौण असून मतदार आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करतात ही गोष्ट स्वागतार्ह आहे. कारण पुनर्विचाराचा हक्क हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

निवडणुकीच्या निकालांची ही सार्वकालिक पार्श्वभूमी लक्षात ठेवून जयाजयाचा अर्थ व देशाचे भवितव्य काय हे जाणण्याचा प्रयत्न केल्यास उपयोगी ठरेल.

## पार्टी पर्ज

या निवडणुकीचा विचार प्रथम काँग्रेस पक्षाच्या संदर्भात करू. काँग्रेसचे दोन शकले पडण्यापर्यंतची थोडक्यात पार्श्वभूमी अशी–१९६७ सालच्या जबरदस्त पराभवामुळे काँग्रेस पक्षात आत्मपरीक्षणाचा एक जोरदार लाट आली. विशेषतः डाव्या शक्तींच्या विजयामुळे काँग्रेसमधील तरुण वर्ग व श्रेष्ठी यांच्यात एक सततचा तणाव सुरू झाला. काँग्रेसची मूळ धोरणे प्रागतिक असून त्यांच्या अंमलबजावणी न होण्याने काँग्रेस जनमानसातून उतरली आहे, असा विचार बळावू लागला. काँग्रेसमधील 'ओल्ड गार्डस्' सर्वसाधारणपणे स्थितीप्रिय असल्याने या डाव्या गटाचा वारंवार कोंडमारा होत असे.

आता सर्वतोमुखी झालेला दहा कलमी कार्यक्रम या गटाच्या दडपणाखाली एक पक्षांतर्गत तडजोड म्हणून श्रेष्ठींनी स्वीकारला. त्याकडे फारसे लक्ष देण्याची फिकड कोणासही नव्हती. या अशा निष्क्रिय मनस्थितीत पक्ष असताना पक्षातील व्यक्तिगत तणाव दिवसेंदिवस वाढत होते. पक्षाचा 'मूड' कोठला है जाणणाऱ्या नेतृत्त्वाची प्रतीक्षा होती.

हि नेतृत्व इंदिरा गांधींनी दिले. दहा कलमी कार्यक्रमाच्या झेंडयाखाली त्यांनी कॉंग्रेसमध्ये स्वतःचे एक वर्तुळ तयार केले. हा कार्यक्रम राबविला तरच पक्षाची यापुढे धडगत आहे याची जाणीव कॉंग्रेस पक्षात वाढू लागली.

या तात्त्विक मतभेदाला अकस्मात महत्त्व प्राप्त झाले ते राष्ट्राध्यक्ष निवडणुकीच्या वेळी. राष्ट्राध्यक्षपदासाठी उमेदवार निवडताना कॉंग्रेस पक्षामधील नेहमीची स्टॅबिलाईजिंग प्रेरणा कमी पडली. इंदिरा गांधींनी या प्रश्नावर अतिशय खंबीर भूमिका घेऊन त्यारूपाने कॉंग्रेसच्या प्रस्थापित नेतृत्वाला जणु ताकीदच दिली.

या ताकीदीला जोर यावा म्हणून दहा कलमी कार्यक्रमातील सर्वात वादग्रस्त पाऊल त्यांनी मोठ्या नाट्यमयतेने टाकले व चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. तेथून पुढे मग श्री. मोरारजी देसाईंची उचलबांगडी, अधिकृत कॉंग्रेस उमेदवार श्री. संजीव रेड्डी यांचा पराभव, एकात्मता ठराव, इंदिराजींची हकालपट्टी (?) व कॉंग्रेसची दोन शकले येथपर्यंत झपाट्याने वाटचाल झाली.

एवढ्या त्रोटक इतिहासावरूनसुद्धा लक्षात येईल, की कॉंग्रेस पक्ष दुभंगला तो इंदिरा गांधींना पाठिंबा की विरोध या मुद्यावर नव्हे. इतर कोणाही नेत्याने दहा कलमी कार्यक्रमाचा झेंडा योग्य वेळी हातात घेतला असता (विशेषतः चव्हाण यांनी) तरीही पुढील सर्व घटना घडून कॉंग्रेस दुभंगली असती.

कॉंग्रेस दुभंगल्यावर प्रश्न निर्माण झाला की खरी कॉंग्रेस कोणती व जनता कोणाच्या मागे? या प्रश्नाचे उत्तर न्यायालयीन मार्गाने मिळण्यासारखे नाही हे उघड आहे. हा वाद काही एकाद्या ट्रेड मार्कसंबंधी नाही. तेव्हा एकच मार्ग उरला म्हणजे मध्यावधी निवडणुका !

या ठिकाणी मुद्दाम स्पष्ट करावयास हवे की देशापुढे कॉंग्रेस की विरोधक हा प्रश्न कॉंग्रेसपक्षाच्या वादळी वाटचालीमुळे कधीच निर्माण झाला नव्हता. १९६७ साली जनतेने केंद्रसत्ता कॉंग्रेस पक्षाच्याच हवाली निर्विवाद केली होती. मध्यावधी निवडणुका घेतल्या गेल्या त्या केवळ कॉंग्रेस पक्षाच्या शुद्धीकरणासाठी.

पार्टी पर्ज म्हणजे पक्षाची साफसफाई. ती करण्याची वेळ अनेकदा येते. रशिया वा चीन सारख्या साम्यवादी देशात पक्षाची साफसफाई निराळ्या म्हणजे पक्ष कुमतीच्या मार्गाने होते.

आणि इंदिरा गांधी यांनीही पहिला टप्पा म्हणून पक्षाच्या अंतर्गत जवळजवळ [illegible] होते. अहमदाबाद व मुंबई येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनावरून खरा पक्ष कोणाचा व बहिष्कृत कोण हे पूर्णपणे

सिद्ध झाले होतेच. पण निजलिंगप्पाप्रणीत कॉंग्रेसने इंदिरा गांधींविरुद्ध हुकुमशाहीचा आरोप केला. लोकांचा कौल न घेता पक्षातल्या पक्षात पक्ष सुधारण्याचा प्रयत्न थोडासा हुकुमशाहीसारखाच भासणार. त्याप्रमाणे इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध हुकुमशाहीचा आरोप मोठे स्वरूप धारण करू लागला. विशेष आश्चर्य म्हणजे विरोधी पक्षही यात सहभागी झाला.

तीन वर्षांपूर्वी जी व्यक्ती 'गुंगी गुडिया' म्हणण्याइतकी मंद व निष्क्रिय होती ती एकदम हुकुमशहा बनण्याइतकी धूर्त आणि पाताळयंत्री झाली कशी? याचा उलगडा कोणत्याही विरोधी पक्षाने केलेला नाही.

हुकुमशाहीचा सततचा आरोप व लोकसमेत (पक्षातील दुफळीने) घटलेले बहुमत या दोन अडचणींवर एकदम तोडगा काढणे आवश्यक होते. खरी कॉंग्रेस कोणती हेही एकदा शाबीत करणे जरूर होते.

या कारणांसाठी इंदिरा गांधींनी मध्यावधि निवडणुकांचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या निवडणुकीत इंदिरा गांधीच्या कॉंग्रेसला निर्णायक बहुमत मिळाले व वर उल्लेखलेली तिन्ही उद्दिष्टे सुफळ संपूर्ण झाली.

निवडणुकीच्या आकडेवारीत शिरण्याचे विशेष कारणच नाही. कॉंग्रेसचे (यापुढे सोयीसाठी इंदिरा गांधींच्या कॉंग्रेसचा उल्लेख असाच करीत आहे.) उमेदवार दीड-दीड दोन-दोन लाख मतांनी निवडून आले. विरोधी पक्षाचे रथीमहारथी पराभूत झाले. मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, राजनारायण, मिनू मसानी, प्रो. रंगा, बलराज मधोक, एम. एल. सोंधी, स. का. पाटील, बिजू पटनाईक, तारकेश्वरी सिन्हा, रामसुभग सिंग, शिवनारायण, अशी किती नावे घ्यावीत? यापैकी कित्येकांनी १९६७ साली मोठमोठ्या उमेदवारांना पराभूत करून विजय मिळवला होता.

कॉंग्रेसखेरीज सर्व पक्षांच्या बळात विलक्षण घट झाली आहे. नवी दिल्ली व मुंबईमध्ये विरोधकांच्या जागा कॉंग्रेसने हिसकावून घेतल्या आहेत. थोडक्यात म्हणजे 'ये इंदिरा तुफान है'

निवडणुकीतील क्रियाशील कार्यकर्ते या यशापयशाच्या मागील कारणाचे संशोधन करतीलच. त्यांना अधिक माहितीही उपलब्ध होईल. परंतु रस्त्यातील सर्वसामान्य माणसाच्या प्रतिक्रिया दोन प्रकारच्या झाल्या हे नमूद करावयास हवे. एक म्हणजे कॉंग्रेसने वाममार्गाचा अवलंब केला असला पाहिजे किंवा दुसरे म्हणजे बहुसंख्य मतदार अडाणी, निरक्षर असल्याने कॉंग्रेसवाल्यांचे फावते.

या प्रतिक्रीया चूक आहेत हे स्पष्टपणे दाखवून देण्याची गरज आहे. भारतीय जनतेचे वैशिष्टय म्हणजे कॉंग्रेसविरोधाचे हे अस्तर सर्वसाधारणपणे सर्वत्र आढळते. कुठे स्थानिक प्रश्नांवर तर कुठे जातीय वर्चस्वाच्या भावनेमुळे (कॉंग्रेसपक्षात त्या त्या प्रांतात त्या त्या ठिकाणच्या बहुसंख्य जातीचे वर्चस्व असते हे सर्वश्रुत आहे.) तर कुठे सत्ताधारी कॉंग्रेसच्या नेत्यांच्या विवेकशून्य वर्तनामुळे. म्हणून कॉंग्रेसचा विजय झाला तो काहीतरी काळेबेरे असल्यामुळे अशी भावना सुशिक्षित

पृष्ठ ९ वर

# अंमलबजावणी अनिश्चित!

वा. दा. रानडे

लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत इंदिरा गांधींच्या काँग्रेसने मिळविलेल्या अभूतपूर्व दणदणीत विजयाने सर्वच विरोधी पक्षांना धक्का बसला आहे. एवढे मोठे यश आपण मिळवू असे इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनाही वाटत नव्हते. चारच वर्षांपूर्वीच्या निवडणुकीत आठ राज्यात काँग्रेसने सत्ता गमावली होती आणि काँग्रेसमधील फुटीनंतर इंदिरा गांधींचा पक्ष आता केंद्र सत्ताही गमावणार असे विरोधी पक्षाच्या नेत्यांना वाटत होते. सिंडिकेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चार पक्षांनी संयुक्त आघाडी स्थापन केली होती. व लोकसभेच्या ४५० जागा एकजुटीने लढविल्या होत्या. आघाडी निश्चित बहुमत मिळवून सरकार बनविणार इंदिरा गांधींच्या पक्षाला १८० ते २०० पेक्षा अधिक जागा मिळत नाहीत. असे त्यांचे अंदाज होते पण 'आघाडीला बहुमत तर नाहीच पण पूर्वीइतक्या जागाही टिकवता आलेल्या नाहीत. सिंडिकेट काँग्रेसची किंवा सिंडिकेट 'आघाडीची सरकारे असलेल्या म्हैसूर, गुजरात, उत्तरप्रदेश व बिहार या राज्यात सुद्धा इंदिरा काँग्रेसने चांगले यश मिळविले आहे.

हा चमत्कार कसा घडला? इंदिरा काँग्रेसला एवढा दणदणीत विजय का व कसा मिळाला? सिंडिकेट आघाडीचा एवढा धुव्वा का उडाला? देशाच्या भावी राजकारणावर याचे काय परिणाम होतील? आपला पराभव खुल्या दिलाने मान्य करुन त्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केले पाहिजे त्या दृष्टीनेच काही विचार येथे मांडीत आहेत.

देशात इंदिरा विजयाचे वारे वाहण्यास खरी सुरुवात उत्तर प्रदेशचे संघटना काँग्रेसचे मुख्यमंत्री त्रिभुवन नारायण सिंग यांच्या मणिराम पोटनिवडणुकीतल पराभवाने झाली. उत्तर प्रदेशातील निवडणूक मतप्रवाहांचे विश्लेषण करताना 'उत्तरप्रदेशात इंदिरा विजयाचे वारे' (माणूस, ६ फेब्रुवारी १९७१) या लेखात मी केलेले अंदाज खरे ठरले आहेत. त्यावेळी मी लिहिले होते: "सिंडिकेट आघाडीचे सरकार स्थापून उत्तर प्रदेशचा गड आपण जिंकला त्या जोरावर

दिल्लीचा गडही सर करून निदान इंदिरा गांधींच्या पक्षाला हुकमी बहुमत निश्चित मिळू देणार नाही. अशी आशा सिंडिकेट आघाडीच्या नेत्यांना वाटत होती. पण उत्तर प्रदेशमधील त्यांच्या गडाचा गडकरीच इंदिरा-कांग्रेसच्या एका साध्या सैनिकाने मणिराम पोटनिवडणुकीत गारद केला. हा गड भक्कम नाही. त्याला सहज खिंडार पाडता येते हे या विजयाचे दाखवून दिले. 'लढाई हरलो पण युद्ध जिंकू' अशा थाटात मणिरामला हार खाल्ली तरी लोकसभा निवडणूक आपण जिंकू असे सांगून आपल्या कार्यकर्त्यांना धीर देण्याचा प्रयत्न सिंडिकेट आघाडीचे नेते करीत असले तरी या पराभवाने निर्माण झालेल्या वातावरणाचा परिणाम नाहीसा करणे त्यांना फार जड जाणार आहे. कारण लोकमताचा लंबक एकदा एका बाजूला सरकू लागला की तो पुन: दुसऱ्या बाजूस वळविणे फार कठीण असते. सर्वसामान्य जनतेत इंदिरा कांग्रेसला अनुकूल आणि सिंडिकेट आघाडीस प्रतिकूल वातावरण तयार होण्यास या छोटयाशा निवडणुकीने मोठी मदत झाली आहे. उत्तरप्रदेशात चांगले यश इंदिरा कांग्रेसने मिळविले तर लोकसभेत हुकमी बहुमत सुद्धा त्या पक्षाला मिळण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे आणि असे हुकमी बहुमत इंदिरा गांधींनी मिळविले तर त्याची सुरवात मणिरामच्या विजयाने झाली अशीच नोंद निवडणुकीच्या अभ्यासकांना करावी लागेल"

कांग्रेसमधील फुटीनंतर सिंडिकेट कांग्रेसच्या ६५ सभासदांनी आपला वेगळा गट लोकसभेत स्थापन केल्याने इंदिरा कांग्रेसचे बहुमत गेले होते. पक्षातील फट इंदिरा कांग्रेसला नडेल व मुदतपूर्व निवडणुकीत केंद्रीय सत्ता तो पक्ष गमवील हा विरोधी नेत्यांचा आडाखा चुकला. 'इंदिरा हटाव' हा त्यांचा एकमेव कार्यक्रम होता पण इंदिरा हटली तर नाहीच उलट सत्तेवर तिने आपली पकड अधिक घट्ट केली आहे. कांग्रेसमधील फुटीनंतर खरी केविलवाणी स्थिती सिंडिकेट कांग्रेसचा झाली. जनसंघ स्वतंत्र पक्ष, संयुक्त समाजवादी या पक्षांचा आधार घेऊनसुद्धा लोकसभेत आपले पूर्वीचे बळ त्यास टिकविता आले नाही. म्हैसूर, गुजरात, उत्तर-प्रदेश, बिहार हे त्याचे बालेकिल्ले ढासळले. आघाडीचा आधार होता म्हणूनच हा पक्ष थोडी तरी तग धरू शकला. स. का. पाटील, डॉ. रामसुभगसिंग, संजीव रेड्डी हे त्याचे अतिरथी-महारथी निवडणुकीत गारद झाले. मुंबई शहर हा सिंडिकेटचा बालेकिल्ला. तेथील पाचही जागा इंदिरा कांग्रेसने जिंकल्या. स. का. पाटील यांची तर फारच शोचनीय अवस्था झाली आहे. मुंबईत स्थान नाही. बनासकाठयात स्थान नाही. लोकसभेत प्रवेश करणे त्यांना आता कठीण जाणार आहे. बाहेरचा उमेदवार नको म्हणून कृष्ण मेनन यांना १९६७ साली ईशान्य मुंबईचे तिकीट नाकारण्यात स. का. पाटील यांचा पुढाकार होता पण परिस्थितीने त्यांच्यावर सूड घेतला. मुंबईतून पळ काढून त्यांना बनासकाठा हा बाहेरचा मतदारसंघ धुंडाळावा लागला. पोटनिवडणूक जिंकली तशी मुदतपूर्व निवडणूकही जिंकू अशी आशा त्यांना

वाटत होती पण ते पराभूत झाले. बदललेल्या वातावरणाची त्यांना कल्पना नव्हती असेच म्हटले पाहिजे.

सिंडिकेटला जनसंघ व स्वतंत्र पक्षाशी केलेली युति नडली. तोंडाने समाजवाद, दहाकलमी कार्यक्रम वगैरे अविभक्त कॉंग्रेसच्या भूमिकेचा पुरस्कार हा पक्ष करीत असला तरी तो उजव्यांचा प्रतिगामी पक्ष आहे ही प्रतिमा जनतेच्या मनात ठाम झाली. निवडणुकीपूर्वी त्या पक्षाचे काही मान्यवर नेते व मंत्री शेकडो अनुयायांसह इंदिरा कॉंग्रेसला मिळाले. इंदिरा कॉंग्रेसच्या अभूतपूर्व विजयानंतर हे पक्षांतर अधिकच मोठ्या प्रमाणात सुरू होईल. पुढच्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकात निवडून यावयाचे तर इंदिरा कॉंग्रेसलाच मिळाले पाहिजे. सिंडिकेटमध्ये राहण्यात काही अर्थ नाही असे या पक्षाच्या आमदारांना वाटू लागले. याचा परिणाम म्हणजे म्हैसूर, गुजरात येथील सिंडिकेटची व उत्तर प्रदेश आणि बिहारमधील सिंडिकेट आघाडीची सरकारे लौकरच गडगडण्याचा संभव आहे. मूठभर नेत्यांचा पक्ष एवढेच प्रत्यक्षात सिंडिकेटचे स्थान राहील.

कॉंग्रेसमधील फूट हा १९६७ च्या निवडणुकीतील त्या पक्षाच्या अपयशाचा अपरिहार्य परिणाम होता. आठ राज्यात कॉंग्रेसने सत्ता गमावली होती. जनमानसातून कॉंग्रेस उतरली होती. ही प्रवृत्ति वेळीच थोपवून कॉंग्रेसला पुनः जनमानसात स्थान मिळवून देण्यासाठी समाजवादाच्या दिशेने धाडशी पावले टाकली पाहिजेत. समाजवाद नुसताच भाषणात किंवा ठरावात न राहता त्या दिशेने प्रत्यक्ष काही कृति जनतेला दिसली पाहिजे. कॉंग्रेसला असे स्वरूप न दिल्यास पुढच्या निवडणुकात केंद्रातील सत्ता आपण गमावू असे इंदिरा गांधींना तीव्रतेने वाटू लागले. कामराज, मोरारजी देसाई या सिंडिकेटच्या नेत्यांशी या प्रश्नावर त्यांचे मतभेद झाले व त्यातूनच पक्षात फूट पडली. राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत संजीव रेड्डींना इंदिरा गांधींनी केलेला विरोध हे केवळ निमित्त होते. सरकारप्रमाणेच कॉंग्रेस संघटना आपल्या पकडीखाली आणून तिला नवे रूप देण्याचा इंदिरा गांधींचा प्रयत्न होता. पण सिंडिकेटचे नेते संघटनेवरील आपली पकड सहजासहजी कशी सोडतील? इंदिरा गांधींनाच पंतप्रधानपदावरून दूर करण्याचा घाट त्यांनी घातला. पुढच्या निवडणुकीत कॉंग्रेसला लोकसभेत हुकमी बहुमत मिळणार नाही हे उघड दिसू लागले होते. हुकमी बहुमत कोणत्याच पक्षाला नसेल तेव्हा पंतप्रधानांची निवड करण्यात राष्ट्रपतींना महत्वाचे स्थान प्राप्त होते. आपल्या बाजूचा राष्ट्रपति असावा म्हणून संजीव रेड्डींची त्या पदासाठी निवड करण्याचे सिंडिकेट नेत्यांनी ठरविले व पार्लमेंटरी केवळ चव्हाणांचे मत सिंडिकेटच्या बाजूला गेल्याने रेड्डींची उमेदवार म्हणून निवड झाली. त्यातून कॉंग्रेसमधील फुटीचे पुढचे सारे रामायण घडले.

इंदिरा गांधींनी मोरारजी देसाईंचे अर्थखाते काढून घेऊन स्वतःकडे घेतले. बँकांचे

पृष्ठ ५४ वर

# निवडणुकीतील धुके आणि धक्के

पृष्ठ ५ वरून

लोकही व्यक्त करतात. या संशयात अगदी मर्यादित प्रमाणावर तथ्य आहे.

पण एवढयाने काँग्रेसच्या या अलौकिक विजयाचे स्पष्टीकरण होत नाही. बहुसंख्य मतदार अडाणी आहे हेही खरे नाही. तो निरक्षर असेल पण त्यालाही विचार करता येतो, हे नाकारण्यात अर्थ नाही. १९६७ साली याच 'अडाणी' मतदारांनी विरोधी नेत्यांना निवडून दिले होते हे विसरून चालणार नाही.

मग या विजयाचे रहस्य काय? अगदीं स्थूलपणे बोलावयाचे झाल्यास ह्या पुरातन पक्षाचे जे शुद्धीकरण १९६९ साली झाले त्यामध्ये या विजयाचे मर्म आहे. पराभूत उमेदवारांत संघटना काँग्रेसचे नेते जास्त आहेत हे लक्षात घ्यावयास हवे. या निवडणुकीत जनतेने या नेत्यांना स्पष्टपणे दाखवून दिले आहे की, काँग्रेस म्हणून आम्ही तुम्हाला ओळखत नाही—इंदिरा गांधींची काँग्रेस हीच खरी व 'आमची' काँग्रेस होय.

या काँग्रेसने जर यापुढे गैरकारभार केला, वा अपेक्षा भंग केला तरी आम्ही ते नंतर पाहून घेऊ. पण तुम्हाला आता काँग्रेस म्हणून स्थान नाही. हा मतदारांचा स्पष्ट कौल आहे. हे असे का याचे उत्तर देणे मात्र कठीण आहे. कारण बहुसंख्य मतदार डाव्याउजव्या या भानगडीपासून दूर असतो. असे असताना संघटना काँग्रेसचा एवढा दारूण पराभव का व्हावा?

याचे एक सोपे उत्तर देण्याचा मोह आवरत नाही. संघटना काँग्रेसचे खासदार साठाच्या आसपास होते हे सगळच्या सगळे जरी निवडून आले असते तरी सरकार बनवू शकले नसते—त्यांना आघाड्यांचे राजकारण करावे लागले असते. तेव्हा या फंदात फुकट पडण्याऐवजी जो एकसंध व सुस्पष्ट असा पक्ष आहे त्यालाच मत द्यावे असा विचार साहजिकच पुढे येतो. ज्याला राज्य करण्याची संधी मिळण्याची शक्यताच नाही त्याला निवडून देण्यात अर्थ तरी काय?

महाराष्ट्रासारखा एकमुखी नेतृत्वाचा प्रांत सोडला तर इतर प्रांतात, चव्हाणां-सारखा सर्वमान्य नेताच नाही. त्या प्रांतातील काँग्रेसमध्ये अंतर्गत विरोध फार आहेत. असे असता तेथेही काँग्रेसला बहुमत मिळाले याचा अर्थ सर्वसामान्य जनता गटबाजी, कोर्टबाजी ओळखत नाही हाच आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे कित्येक उमेदवार जिल्ह्याच्याबाहेर फारसे परिचित नसलेले असे आहेत. हे सर्व दिसत अस-ताना काँग्रेसच्या विजयाचे स्पष्टीकरण उथळ राजकारणीपणात शोधणे चूक आहे.

सामान्य जनतेने विचार केलेला आहे, मागील तीन चार वर्षांच्या घटना तिच्या-पर्यंत पोहोचल्या आहेत व त्या संदर्भातच हा कौल जनतेने दिला असे मानल्या-खेरीज दुसरा पर्याय नाही.

यथपर्यंत मध्यावधी निवडणुकांचा विचार कॉंग्रेस पक्षाच्या संदर्भात केला. आता विरोधी पक्ष व निवडणुका याचा विचार करावयास हवा. राष्टच सांगावयाचे तर विरोधी पक्षांनी याबाबतीत आपले फार हसे करून घेतले आहे. सुरुवातीपासून त्यांची भूमिका कशी बदलली हे पाहणे मनोरंजक ठरेल.

कॉंग्रेस पक्ष फुटला तेव्हा विरोधी पक्षांनी पुकारा केला की इंदिरा गांधींना बहुमत नाही तेव्हा त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. मात्र याचबरोबर त्यांनी पर्यायी सरकारची योजना पुढे ठेवावयास हवी होती ती ठेवली नाही. नंतर काही दिवसांनी संस्थानिक तनखेबंदी प्रकरणी त्यांनी अशीच चमत्कारिक भूमिका घेऊन तिच्याद्वारे इंदिरा गांधी हुकुमशहा आहेत या संघटना कॉंग्रेसच्या आरोपाला हातभार लावला. यात संसोपा गारखा जहाल पक्ष पुढे होता.

जेव्हा इंदिरा गांधींनी लोकसभा बरखास्त करण्याची शिफारस केली तेव्हा मात्र विरोधी पक्षांनी या निर्णयाला विरोध केला. कारण काय? काहीही नाही. आपणास योग्य अशा वेळी पंतप्रधान निवडणुकी घेत आहेत हा आक्षेप राजकीय पक्षांना शोभत नाही. त्यांनी निवडणुकीस कधीही उत्सुक असले पाहिजे. विशेषतः इंदिरा गांधींनी राजीनामा द्यावा अशी मागणी करणारांना निवडणूक ही सुवर्ण संधी वाटावयास हवी होती–पण विरोधी पक्षांनी 'विरोध' केला. यापुढची त्यांची भूमिका खरोखर विलक्षण आहे–जी निवडणूक त्यांना नको होती व जी त्यांच्यावर लादली गेली होती ती लगेच एका महिन्यात निर्णायक, ऐतिहासिक वगैरे झाली येथे एका प्रचारपत्रकातील मजकूर उद्धृत करणे मनोरंजक ठरेल–

'या वेळची निवडणूक अतिशय कसोटीची आहे...या सत्ताधाऱ्यांना हटवून स्वातंत्र्य, लोकशाही आणि राष्ट्रवाद यांना आपणास विजयी करावयाचे आहे.'

कमाल आहे की नाही? जर इंदिरा गांधी लोकसभा विसर्जित करीत नव्हत्या तर हा कसोटीचा ऐतिहासिक क्षण आलाच नसता. डिसेंबर १९७० आणि फेब्रुवारी १९७१ या कालावधित अशी कोणती गोष्ट घडली की ज्यामुळे स्वातंत्र्य, लोकशाही धोक्यात आली?

विरोधकांची पुढची चूक म्हणजे 'बडी आघाडी', संसोपा, जनसंघ, स्वतंत्र आणि संघटना कॉंग्रेस यांची आघाडी ही एक ऐतिहासिक चूक म्हणून नोंदली जाईल हे खरे! पहिल्या तीन पक्षांना तरी स्वतंत्रपणे जास्त जागा मिळाल्या असत्या–पण संघटना कॉंग्रेसच्या जाळ्यात हे पक्ष सापडले–त्यांचे ध्येयवादात्मक अस्तित्वच नाहीसे झाले. विरोधी पक्षांनी संघटना कॉंग्रेसच्या सुरात सूर मिळवण्याचा मोह टाळला असता व लोकशाहीविरुद्ध हुकुमशाही वगैरे बागुलबुवे निर्माण केले नसते तर बरे झाले असते ज्यांच्या मागे एका बलाढ्य पक्षातील केवळ पंचवीस टक्के लोक, तो लोकशाहीवादी गट हे जनता मान्य तरी कशी करील?

कॉंग्रेसच्या घरगुती भांडणात पडून विरोधी पक्षांनी फार नुकसान करून घेतले. संघटना कॉंग्रेस 'इंदिरा हटाव' म्हणते ते समजू शकते पण विरोधी पक्षही तेच

म्हणतात याचा अर्थ काय? त्यांना इंदिरा वा चव्हाण वा आणि कोणी व्यक्ति यांच्याशी काय कर्तव्य होते? 'काँग्रेस हटाव' असे त्यांनी म्हटले असतें तर ते समजण्यासारखे होते.

इंदिरा गांधी खाजगी मालमत्ता काढून घेणार वगैरे प्रचार खेड्यातील जनतेला कसा पटणार? डोळ्यादेखत जिथे कधी नव्हती एवढी मालमत्ता, संपत्ति निर्माण होते आहे, भरमसाठ कर्ज मिळते आहे तेथे या प्रचारावर विश्वास कसा बसणार?

विरोधी पक्षांच्या विशिष्ट आघाडीमुळें या निवडणुकीला डावे विरुद्ध उजवे हा रंग प्राप्त झाला – त्यामुळे 'उजवे' समजले जाणारे सर्व (यात फर्नांडीस, मधू लिमये हेही आहेत!) पराभूत झाले. या ध्रुवीकरणामुळे इंदिरा गांधींच्या एका तक्रारीस पुरावा मिळाला–त्या असे म्हणत की कार्यक्रम अंमलात आणावयाची इच्छा होती पण संघटना काँग्रेसचे नेते आड येत होते.

विरोधकांच्या पराभवाचे आणखी एक कारण म्हणजे त्यांच्या राजवटीत जनतेला आलेला अस्थिरपणाचा अनुभव. एकेका राज्यात पाच पाच सरकारे झाली. कित्येक गट तयार झाले, कित्येक फुटले, आयारामी बोकाळले आणि खेदाची गोष्ट म्हणजे या खिचडी सरकारांचा कारभारही तितकाच (म्हणजे काँग्रेस इतकाच) वाईट होता. राजकीय संधीसाधूपणाचा जनतेला तिटकारा आल्याचे ठळकठळीत उदाहरण म्हणजे चरणसिंग यांचा पराभव. या महाभागाने राजकीय कसरतीचा उच्चांक गाठला होता.

विरोधी पक्षाचा हा पाडाव ज्या मतामुळे झाला त्या मतास नॉन–नॉन काँग्रेस व्होट अशी थोडी विक्षिप्त संज्ञा देण्यास हरकत नाही. पूर्वी जसं काँग्रेस नको म्हणून विरोधकांना मते मिळत तसे आता विरोधक नको म्हणून काँग्रेसला मते मिळाली. ज्या कम्युनिस्टांचे भय विरोधी पक्षांनी जनतेला घातले त्या कम्युनिस्टांना जनता अधिक चांगली ओळखते असे सिद्ध झाले. जनतेला कम्युनिझम नको आहे, तो येऊ नये म्हणून इंदिरा गांधींच्या काहीशा पुरोगामी धोरणांना जनतेने भरघोस पाठिंबा दिला हे उघड आहे. विरोधी पक्षांनी जनतेला कम्युनिझमचे एवढे भय घातले नसते तर कदाचित चित्र थोडे त्यांना अनुकूल झाले असते.

निवडणुका झाल्या– इंदिरा गांधींची काँग्रेस आता भारतावर पाच वर्षे राज्य करणार– आता पुढे काय?

राजकारणात भविष्य वर्तविणे थोडे धोकादायक असते याची प्रचीति नुकतीच आली आहे. परंतु प्रस्तुत लेखकाने ऑगस्ट १९६९ मध्ये जे राजकीय भविष्य वर्तविले होते ते पुढे पाचच महिन्यात खरे झाले. (किर्लोस्कर-सप्टेंबर १९६९) त्यामुळे थोडीशी ज्योतिषीगिरी करण्यात हरकत नाही. काँग्रेस पूर्णपणे दुभंगेल असे ज्या वेळी कोणासही वाटत नव्हते त्यावेळी मी काँग्रेस दुभंगणार असे ठामपणे लिहिले होते. त्यानंतर एकात्मता ठराव वगैरे होऊन रीतसर काँग्रेस नोव्हेंबर १९६९ मध्ये पूर्णपणे दुभंगली. असो.

निर्णायक बहुमत मिळाल्याने इंदिरा गांधी व त्यांचा पक्ष मानसिक दृष्ट्या थोडासा समतोल (मिल्लून) होईल. बँक राष्ट्रियिकरण, तनखेबंदी या बाबींमध्ये त्यावेळेस थोडीशी धुडकावून लावण्याची (डिफायन्स) भावना होती. तुम्हाला नको तर आम्ही करणारच असा तो कॉंग्रेसमधील अंतर्गत सामना होता. आता त्या पवित्र्याचा उपयोग नाही. जनतेने सर्व सूत्रे कॉंग्रेसच्या हातात दिली आहेत तेव्हा बडखोरीतील उन्माद आता गैर लागू ठरणार आहे.

कॉंग्रेसची सर्व धोरणे आता मध्यापेक्षा थोडी डावीकडे अशी पण थोडी धीमी राहतील. जाहीरनाम्यात काहीही लिहिले व सभेत काहीही सांगितले तरी प्रश्न इतके बिकट आहेत, गुंतागुंतीचे आहेत की वाटेल तसे ढसमुसळेपणाने काही करता येणार नाही. आता कोणाच्या आड दडता येणार नाही. तेव्हा जे करावयाचे ते पूर्ण जबाबदारी घेऊनच केले जाईल.

वटहुकुमांनी वा संसदेच्या कायद्यांनी दारिद्र्य दूर होणार नाही—त्यासाठी काही नियंत्रणे घालावी लागतील—काही सवलती द्याव्या लागतील—काही संकेत रूढ करावे लागतील. नव्या कॉंग्रेस सरकारने कोणती धोरणे ठेवावीत हे सांगण्याचे हे स्थळ अर्थातच नव्हे. परंतु कॉंग्रेस यापुढे गेल्या वर्षा-दीड वर्षापेक्षा अधिक परिपक्वता दाखवील अशी खासच अपेक्षा आहे.

शेवटी इंदिरा गांधी या व्यक्तीविषयी थोडेसे लिहिलेच पाहिजे. वाचक म्हणतील, की ज्या नावावर निवडणूक लढवली व जिंकली गेली ते नाव सर्वांत शेवटी घेणे म्हणजे कठीण आहे. पण वर एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणे कॉंग्रेसमधील ग्रेट कॅटॅलिसिसमध्ये इंदिरा गांधी ही व्यक्ती काही अपघातानेच प्रभावी ठरली आहे. कॉंग्रेसचा व देशाचा जो अस्वस्थ मूड होता त्याच्याशी श्रीमती गांधींनी एक प्रकारचा नाट्यमय व नेकदार असा सुसंवाद साधला, या मूडचे स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात प्रतिनिधित्व केले व एक बेहोशित काही पावले त्या चालल्या.

जनतेने त्यांना साथ दिली आहे. दोन कड्यांच्या मधील जागा पार करताना एका जिद्दीने उडी मारावी लागते हे खरे पण त्यानंतरही उड्याच मारीत राहिल्याने दमछाक होण्याचा संभव जास्त.

आज असा भास होतो की इंदिरा गांधी म्हणजे देशाचे भवितव्य. अगदी मर्यादित अर्थाने हे खरे आहे. त्या जोपर्यंत जनतेच्या भावनांशी समरस होतील तोपर्यंत त्यांचे धोरण व अंमलबजावणी यातील अंतर जनता खपवून घेईल. कारण जनतेची भाषा बोलणे हेदेखील या सरंजामशाही देशात नाविन्यच आहे. हे नाविन्य त्यांना काही काळ पुढे नेईल. त्यापुढे त्यांची वाटचाल त्यांनीच करावयाची आहे.

भारतीय निवडणुकांचे निकाल केवढा धक्का देऊ शकतात याचा अनुभव त्यांनाही देण्यास जनता मागेपुढे पहाणार नाही ही जाणीव त्यांनी ठेवली तर त्यांची वाटचाल देशाची वाटचाल ठरेल.

□ □ □

# हे कलकत्ता

सौ. तारा पंडित

## सैन्यदल आणि मतदान

सर्व राजकीय पक्ष हे प्रजासत्ताक मतप्रणालीचे पुरस्कर्ते असतात. हिंसाचाराच्या कोणत्याही कृत्यापासून मतदानाची प्रक्रिया अलिप्त ठेवणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. मात्र बंगालमधील पाचवी सार्वजनिक व सहावी प्रांतीय निवडणूक मात्र सैन्याच्या मदतीने पार पाडावी लागणार आहे, हा केवळ दैवदुर्विलास होय. इतर राज्यांमध्ये त्या त्या प्रांतीय अधिकारी वर्गाकडूनच सर्व व्यवस्था होऊ शकते. त्यांना सैन्याच्या मदतीची गरज भासत नाही. अर्थात् कॉंग्रेस सत्ताधारी असेपर्यंत इथेही अशी गरज कधी भासली नव्हती. १९६९ मध्ये घटनेनुसार राज्यपालांचे वर्चस्व असतानाही अशी पाळी आली नाही, जरी राज्यपाल जनतेला विशेष पसंत नव्हते. त्यानंतर यू. एफ. सरकारची कारकीर्द सुरू झाली. त्याच काळात शेवटी शेवटी हिंसेने येथे प्रवेश केला आणि केवळ तेरा महिन्याच्या अल्पकाळांत आपआपसातील बेबनावामुळे यू. एफ. सरकार कोसळले आणि मग मात्र हिंसाचारांनी सर्व बंगाल व्यापून टाकला. पुन्हा राज्यपालांचे वर्चस्व सुरू झाले. त्यांना पाच मदतनीस असूनही हिंसाचारांना आळा घालताच आला नाही.

आज तर अशी परिस्थिती आहे की खून पडणे हा रोजचा व्यवहारच झाला आहे; आणि मतदारांना मत द्यायला जाण्यासाठी देखील संरक्षणाची गरज भासावी इतक्या थराला सान्या गोष्टी गेल्या आहेत. आता या क्षणी मिलीटरी शहरात येऊन पोचली आहे. जेणेकरून मतदारांना १० मार्च रोजी आपली मते सुखासुखी मतपेटीत टाकता येण्याची शक्यता आहे.

## विकृत मनोवृत्ती ?

दुपारची वेळ. कलकत्यातील एक गजबजलेला चौक. बसस्टॉपवर अनेक लोक बसची वाट पहात उभे असलेले. त्यांच्यातच एक मध्यमवयीन स्त्री. तिच्या अंगात स्लीव्हलेस ब्लाऊज असल्यामुळे दंड उघडा. तिच्या ह्या उघड्या दंडाकडे तो अनि-

मिष नेत्रांनी पलीकडच्या फूटपाथवर बघत असलेला...त्याला राहावत नाही. शेजारच्या दुकानात जाऊन तो एक ब्लेड खरेदी करतो. धावत इकडच्या फूटपाथला येतो. तोवर बस आलेली असते. लोक चढण्याच्या गर्दीत असतात. तो आपले सावज हेरतो नि संधि साधून तिच्या दंडावर हातातल्या ब्लेडने चरा पाडतो. ती ओरडते. लोकांचं लक्ष वेधलं जातं. एकच गोंधळ माजतो. लोक त्याला पकडतात नि पोलिस ठाण्यावर घेऊन जातात. चौकशी सुरुं होते...

आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा तरुण आपला अपराध कबूल करतो. यापूर्वीही त्याने तीनचार वेळा असा प्रयोग केलेला असतो. त्याला कारण विचारण्यात येते. केवळ २०–२२ वर्षांचा हा तरुण हकीकत सांगतो ती अशी—

एकदा एक इंग्रजी सिनेमा पाहून आल्यानंतर त्याला वरील प्रयोग करून पाहण्याची इच्छा झाली. एकदोनदा असे केल्यावर त्याला तोच नाद लागला. रोज दुपारचे वेळी तो बाहेर पडत असे व आजूबाजूच्या बसस्टॉपवर उभ्या असलेल्या तरुण स्त्रियांपैकी एखादीचा उघडा दंड दिसताच त्यावर ब्लेडने चरे पाडण्याची त्याला अनावर इच्छा होई. कसल्यातरी झपाटलेल्या मनस्थितीत तो हे करून जाई. अर्थात् नंतर त्याला त्या कृत्याबद्दल वाईटही वाटलेले आहे.

ही हकीकत ऐकून पोलीस अधिकाऱ्यांना नवल वाटले. आता तो मुलगा मानसशास्त्र तज्ज्ञांच्या ताब्यात उपचारासाठीं दिलेला आहे.

## कशासाठी हा विध्वंस ?

कॉमर्सचा हा एक विद्यार्थी. राजकारणात किंवा राजकीय विवादरंगीत विशेष रस न घेणारा. पण प्रचलित विध्वंसक परिस्थितीने मात्र त्याला विचार करण्यास भाग पाडले आहे. ही अराजकता एवढी का म्हणून माजली ? ती कोणत्या थराला जाणार ! तिचे परिणाम काय होणार ? ... इत्यादि प्रश्नांनी त्याच्या मनाला 'घेराव' केला. तो म्हणाला—

'ह्या साऱ्या विध्वंसनाच्या मुळाशी नक्षलवाद्यांचाच हात आहे अशी सर्वसाधारण समजूत आहे आणि सारे नक्षलवादी म्हणजे हिंसक वृत्तीचे तरुण अशी व्याख्याच केली जात आहे. पण हे तरुण विध्वंसनाकडे का वळले याचा कोणी विचार केला आहे काय ? आज देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे निरीक्षण केले तर काय दिसते ? चार भाग्यवान लोक कल्पनेबाहेर चैनी व विलासी जीवन जगत आहेत. पण त्याचबरोबर शेकडो लोकांना आपल्या आत्यंतिक गरजा भागवणे देखील कठीण जात आहे. हजारो लोकांना पोटभर जेवण नि अंगभर वस्त्र मिळण्याची मारामार आहे आणि लक्षावधि लोक अन्न–वस्त्र–निवारा ह्या अभावीच जीवन जगत आहेत.

'स्वातंत्र्यानंतर आपण काय मिळवले असेल तर हे! गेल्या तेवीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात पंचवार्षिक योजनांद्वारे अनेक आश्वासने सरकारने देऊनही सारी संपत्ती मोजक्या हातांमध्येच खेळत राहिली. आपल्या देशात वैयक्तिक मालमत्तेवर प्रतिबंध नसल्यामुळे उत्पादीत साठा मोठ मोठ्या उद्योगपतींच्याच हातात राहू शकला. थोडक्यात, श्रीमंत हे अधिक श्रीमंत होत गेले आणि गरीब आणखीच गरीब झाले. ह्या दोन वर्गात एक फार मोठी दरी निर्माण झाली. सामाजिक व आर्थिक जीवनाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यात प्रतारणेने प्रवेश केला आणि आपल्यातील नीतिमत्ता अगदी जमीनदोस्त झाली.

'आज हजारो सुशिक्षित तरुणांना त्यांचा यत्किंचितही दोष नसताना, नुसते बेकार बसावे लागत आहे आणि त्यांच्यात अधिकाधिक भर घालीत आहेत आपली विद्यापीठे! ह्या सगळ्या तरुणांचे भवितव्य काय आहे? त्यांनी काय रात्रंदिवस आपल्या नशिबाला दोष देत आळशासारखे बसून राहावे?'

'आजच्या अस्थिर अशा सामाजिक व आर्थिक परिस्थितीतूनच आज दिसून येणारी अशाश्वतता जन्मलेली आहे. माझ्या मते तरी नक्षलवादी हे राजकीय परिस्थिती बदलूनच सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारू इच्छितात आणि हे करण्यासाठी त्यांनी आदर्श म्हणून डोळ्यासमोर ठेवलेल्या माओच्या मार्गाचे ते अनुकरण करीत आहेत. म्हणून त्यांच्याकडून होणारे विध्वंसन म्हणजे राजनैतिक परिस्थिती सुधारण्याचा एक क्रांतिकारी मार्ग आहे असे मी म्हणेन!...'

## कहाणी बारानगरची!

बारानगर...कलकत्त्याचे एक उपनगर. इथे भरलेली एक प्रचंड सभा... सभेत बोलत असलेले अजयबाबू...त्यांच्या भाषणानें तात्पुरते प्रभावित होणारे लोक... योग्य ठिकाणी टाळ्यांचा कडकडाट ..

हे दृश्य ता. १९ फेब्रुवारीच्या सायंकाळचे. गमंत अशी की ह्या बारानगरामधूनच अजयबाबू नि ज्योतीबाबू हे दोघे उभे आहेत—एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून! एके काळचे हे मित्र आज कट्टर शत्रू बनले आहेत. एकमेकांचे दोष उघड बोलून दाखवित आहेत. बंगला काँग्रेसचे अग्निनेते अजयबाबू ह्यांनी घेतलेली ही पहिली-वहिली निवडणुकी बाबतची सभा. ह्या सभेत ते म्हणाले, 'लोकहो, राज्यात शांतता हवी असेल तर आपल्या मतदानाच्या साह्याने सी. पी. आय्. एम्. चा जरूर पराभव करा. कारण आजच्या ह्या रक्तपाताला सी. पी. आय्. एम्. च जबाबदार आहे, हे स्पष्टच आहे. त्यांनी आजवर आपल्या पक्षाची शक्ती वाढवली ती केवळ जुलुम, जबरदस्ती आणि रक्तपात ह्या अनिष्ट मार्गांनी आणि असा पक्ष निवडून येणे म्हणजे पुढील अनर्थ अटळ आहेत हे सिद्ध करून दाखवण्यासारखेच होय.' स्वतः-

बद्दल सांगताना ते म्हणाले, 'मी एक फार जुना जनतेचा सेवक आहे. बरीच वर्षे मी जनतेची सेवा केली आहे. आता मी उभा आहे तो केवळ जनतेला पुढील संकटापासून सावध करण्यासाठीच.' अजयबाबूंचे नक्षलवाद्यांशी मुळीच वाकडे नाही. नक्षलवादी निर्माण करणे व त्यांच्याशी शत्रुत्व प्रस्थापित करणे ही कामे सी. पी. आय्. एम्. पक्षाचीच आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. ते स्वतःला गांधीवादी म्हणतात व अहिंसेवर त्यांची श्रद्धा आहे. तरीपण 'नक्षलवाद्यांचीही काही विशिष्ट तत्त्वे आहेत' एवढे ते मानतातच. अजयबाबू म्हणाले– 'सर्वांचे डोळे आता बारानगरकडे लागले आहेत. कारण माणसाने जिवंत राहायचे की मरायचे हा सवाल आहे. दोन वर्षांपूर्वी मी ज्योती बसूंच्या बाजूने बोललो असेन पण आज मात्र मी त्यांचा प्रतिस्पर्धी म्हणून लोकांसमोर उभा राहात आहे.'

अजयबाबूंच्या ह्या सभेला प्रचंड जनसमुदाय होता असे जरी म्हणता आले नाही तरीपण प्रचलित असुरक्षित वातावरणाचा विचार करता जमाव बराच मोठा होता असे म्हणण्यास हरकत नाही. अजयबाबू बराच वेळ बोलले. त्यांच्या सभेत कोणत्याही प्रकारचे अडथळे निर्माण झाले नाहीत. आता सभेला आलेले सर्व लोक त्यांना मत देतीलच असे नाही, तरीपण त्यांचे भाषण अगदी शांत चित्ताने लोक ऐकून घेत होते हे निश्चित.

सभेच्या काही वेळ अगोदर त्यांची धावती मुलाखत घेण्यात आली व मोजके प्रश्न विचारण्यात आले. वयाने ७१ वर्षांचे, शाकाहारी भोजन करणारे, सिगारेट न घेणारे व किंचित ठेंगणे असे अजयबाबू शरीरप्रकृतीने अगदी उत्तम आहेत. 'इतक्या ठिकाणी तुम्ही मुक्तपणे हिंडता व प्रत्येक भाषणात, ज्याची अहिंसेवर मुळीच श्रद्धा नाही अशा आपल्या प्रतिस्पर्ध्यावर उघड टीका करता तेव्हा तुम्हाला घाबरायला होत नाही काय' असे विचारले असता ते म्हणाले– 'मी भित्रा असतो तर देशसेवेचा विचार माझ्या मनातून कधीच नष्ट झाला असता. मी एकेकाळी ब्रिटिशांच्या गोळ्यांना देखील तोंड दिलेले आहे आणि अलीकडेसुद्धा माझ्यावर कमी हल्ले झालेले नाहीत. माझ्या शब्दकोषात भीती हा शब्द नाही.' एका महान व्यक्तीच्या शब्दांचा त्यांनी मोठ्या चतुरपणे उपयोग केला खरा. 'आपल्या हाती सत्ता आल्यानंतर आपण शांतता प्रस्थापित करू शकाल काय? जेथे केंद्रीय राखीव पोलिससुद्धा अयशस्वी ठरले येथे आपण कोणत्या मार्गाने शांतता निर्माण करणार?' यावर ते जोराने म्हणाले– 'मी बरोबर शांततेचे वातावरण निर्माण करीनच अशी माझी खात्री आहे. अहिंसेचा मी पुरस्कर्ता असलो तरीदेखील वेळ पडल्यास लाठी व बंदुकीच्या गोळ्यांचाही वापर करीन. कारण राज्य चालविण्याच्या विचारसरणीत अहिंसा तत्त्व अजून तरी तितकेसे सामावत नाही. गांधीजींनी सुद्धा नाही का सापेक्ष अहिंसेचा पुरस्कार केला?'

–आणि मुलाखत संपली.

□ □ □

# गुयामचे

## युद्ध की वनवास ?

इटा मसाशीच्या
एम्परर्स लास्ट सोल्जर्स
या पुतकाचा परिचय....

वसंत भणगे
लेखांक : एक

आकाशात नुकतंच कुठं तांबडं फुटत होतं. विमान हल्ल्याच्या इषाऱ्याने आम्ही सावध झालो. किती तरी बाँबर विमाने आमच्या ठाण्याच्या बाजूने झेपावली आणि आम्ही मनाशी गाठ बांधली की, अमेरिकन सैनिक आता हल्ल्यासाठी बाहेर पडले आहेत. पॅसिफिक महासागरातील गुयाम या बेटावरील जपानचे अमेरिकेला ते आव्हान होते.

आमच्या मुख्य लढाई केंद्रावरून आम्हाला संदेश आला की, पश्चिम किनाऱ्यावर अमेरिकन सैनिक मोठ्या संख्येने उतरलेले आहेत. आम्ही बऱ्याच उंच भागात होतो. अमेरिकन विमानदलाची बरीच विमाने किनाऱ्यावरील धावपट्टीवर विखरून पडली होती. त्यातील बहुतेक बाँबफेकी होती. आम्हाला सखल भागात उतरून दक्षिणेकडील टेकडीवर आगेकूच करण्याची सूचना देण्यात आली. सगळीकडे छोट्या छोट्या टेकड्या असलेला तो भाग होता.

आमची संरक्षण आघाडी तशी शांतच होती. मशिनगन्स, तोफा अगदी थंड

पडल्या होत्या. हल्ल्याची सुरुवात शत्रूकडूनच होई. त्यांचं नाविक दळ सज्ज होतं. ब-याच वेळा स्वैर बाँबफेक झाली.

आम्ही जरी प्रतिकार करत नव्हतो तरीं तो आमच्या योजनेचा एक भाग होता. ग्वाडालकॅनालवर अमेरिकन सेनेने हल्ला चढवून आता पुरा एक महिना झाला होता. त्या हल्ल्यावरून आम्हीं एक गोष्ट शिकलो होतो. हल्ला करणाऱ्या विमानांवर आम्ही प्रत्यक्ष कधीच हल्ला चढविला नाही. त्यांची कामगिरी पूर्ण करण्यासाठी त्यांना आम्ही वाव दिला. खरं पाहिलं तर ते शत्रूला आमिष होतं; प्रलोभन होतं. शत्रू इतर ठिकाणी हल्ल्यासाठी गुंतला आहे असे पाहून त्यांच्या युद्ध साहित्याचा जिथं साठा असेल अशा जागेवर आम्ही चाल करून जात असू आणि आज अगदी प्रातःकालीच शत्रूनं हल्ला केल्यावर आम्ही विचार केला की ते आपल्या तळावर परतल्यावरच प्रतिहल्ला चढवायचा. विभागीय अधिकाऱ्याकडून तशी आज्ञा येण्याची आम्ही वाट पहात बसलो.

पण नंतर आमच्या ध्यानात आलं की, आमच्या या युक्तीचा पूर्ण बोजवारा उडविला गेला आहे. अमेरिकेच्या प्रचंड आरमाराला तसा गुंगारा देणं सोपं नव्हतं. विमाने, रणगाडे, उखळी तोफा आणि प्रचंड संख्येने सैनिकांचा ताफा पाहिल्यावर आमच्यावर शत्रूला हल्ला न करायला देता गारद करणे हवेतीलच कल्पना ठरली असती. आमची तो आत्मवंचनाच होती. यावेळी त्यांना हुलकावणी देणं शक्य नव्हतं.

संध्याकाळ झाली. अमेरिकन आणि ऑस्ट्रेलियन युद्ध पथके किनाऱ्यावर विसावा घेत होती. आम्ही समजून चुकलो होतो की, प्रतिहल्ला चढवायची वेळ निघून गेली आहे. युद्ध बेटाच्या मध्य भागातच रेंगाळत होतं. किनाऱ्यावर हल्ला करायची कल्पना आम्ही सोडून दिली. आम्ही मागे फिरलो. केवळ पाचच दिवसात जपानी हल्ल्याची धार बोथट झाली होती. मग छुप्या हल्ल्याखेरीज दुसरा मार्ग आमच्या पुढे नव्हता.

आमच्या पथकात आम्ही तीस जण होतो आणि पथकाचे नेतृत्व होते कॅडेट ओसाडा यांचेकडे. दारूगोळा कमी पडत चालला होता. पण काही झालं तरी जिवंत असेपर्यंत आम्ही झुंज देण्याचे ठरविले होते. अमेरिकन ऑस्ट्रेलियन सैनिक आमची पाळेमुळे खणून काढणार होते. केवळ जगण्यासाठी प्रयत्न करणेच आमच्या हाती होतं आणि त्याचसाठी आमची धडपड चालली होती.

सबंध ऑगस्ट महिना झाडाझुडपाआड लपत, शत्रूला हुलकावण्या देत आम्ही काढला. प्रतिहल्ल्याची वाट आम्ही पहात होतो. सप्टेंबरला आम्ही शत्रूंच्या तीन रणगाड्यावर हल्ला चढविला. त्यात आमची दहा माणसे कामाला आली.

त्यानंतर असाच एक जिवावरील प्रसंग आला पण त्यातून नशिबाने आम्ही बचावलो. काही शत्रू सैनिक आमच्या रोखाने पुढे येत होते. आम्ही पुढे असू याची

त्यांना कल्पना नव्हती. जपानी सैनिकासारखी त्यांनी लोखंडी शिरस्त्राणे घातली होती. आम्ही काहीसे बेसावध होतो. एकाचे आमच्याकडे लक्ष गेले. ते सर्व ऑस्ट्रेलियन होते. आमच्यावर रायफल रोखली गेली होती. ओसाडा अगदी सामोरा आला होता. माझं त्यांच्याकडे चटकन् लक्ष गेलं. सर्व शक्ती एकवटून मी एक हात बॉंब त्यांच्यावर फेकला. सगळं क्षणार्धात शांत झालं.

"किती छान झालं !" ओसाडा माझ्याकडे पहात म्हणाला. माझी कामगिरी त्याच्या ध्यानात आली होती. आम्ही मागे फिरलो. तेथूनच घनदाट जंगलाला सुरुवात होत होती.

ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीला आमच्या रायफलना लागणारा दारूगोळा जवळजवळ संपत आला होता. त्यामुळे पुष्कळ हत्यारे निकामीच झाली. आमच्या हातातील हत्यारांवर जपानी साम्राज्याची चिन्हे होती. अशी हत्यारे शत्रूच्या हाती पडू नयेत म्हणून आम्ही ती पुरून टाकली. आमच्या जवळील कोरड्या पावांचा साठा संपण्याच्या मार्गावर होता. फळे आणि कंदमुळे यासाठी आम्हाला रानोमाळ भटकावे लागणार होते. भुकेने पोट दुखू लागले. हातात हातबॉंब ठेवून आम्ही आशा बाळगली होती की, आमच्या मदतींसाठी आता नवी कुमक येईल.

"मुख्य तुकडी आता थोडयाच दिवसात आमच्या मदतीसाठी येणार आहे." ओसाडा आमची सांत्वना करत होते. "प्रसंग येईल तसं आपल्याला वागावं लागणार आहे. लपतछपत आपणाला दिवस काढावे लागणार. काही थोडयाच दिवसाचा प्रश्न आहे. कुत्र्यासारखं मरण्यापेक्षा वा कैदी म्हणून जगण्यापेक्षा दुसरी लांछनास्पद गोष्ट नसेल. आणि जिद्दीने जिवंत रहाण्याचा प्रयत्न करू या तीच आमच्या मातृभूमीची खरी सेवा आहे."

शत्रूचे अधूनमधून हल्ले तसे थांबले नव्हते. नोव्हेंबरपर्यंत आमची संख्या सात झाली. गोळीबाराचा आवाज कुठून ना कुठून तरी ऐकू यायचा. एकंदरीत वातावरणावरून मनात शंका डोकावू लागली की, जपानने प्रतिकार करायचे टाळले आहे किंवा आमच्या मदतीसाठी त्यांना संधी मिळत नसावी.

एका भरदुपारी मळलेल्या रस्त्यावरून चालत असताना अगदी जवळून झाडलेल्या फैरीचा आवाज झाला. प्रत्यक्ष काय असेल ते आम्ही पहायचे ठरविले. मी त्याच वेळी खाली बसून माझ्या पायाच्या बुटांची सुटलेली दोरी पुन्हा बांधत होतो. गडबडीत बांधणं बाजूलाच पण एक गाठ बसून बुट बांधणेही लवकर शक्य होईना. सहा जण पुढे गेले होते. त्यातील एकाने म्हटलं,

"अरे इटो, चल ना, मग करता येणार नाही का ते !"

परत बुटाची दोरी व्यवस्थित बांधेन आणि त्याला तसा काही वेळ लागणार नाही याची मला खात्री होती. पण भुकेने आणि थकव्याने माझ्या हातांच्या बोटात काहीच त्राण नव्हते. कल्पनेपेक्षा मला जरा जास्त वेळ लागला. पुढे गेलेल्या साथी-

वारांच्या बुटांचा आवाज ऐकू येईनासा झाला.

मी बुटांची गाठ व्यवस्थित बांधून त्यांना गाठण्यासाठी उठलो मात्र. एक सू सू करत गोळी आली आणि माझ्या डाव्या खांद्यावरून गेली. वाळूच्याच वाटेने ऑस्ट्रे-लियन पथक पुढे सरसावत असल्याचे मला दिसले. मी झाडीत मुसंडी मारली आणि खाडच्या वाटेला लागलो. बऱ्याच फैरी झाडल्या गेल्या. एक हातबॉम्बही फुटला. काही वेळातच त्यांच्या पायांचा आवाज विरला आणि शांतता पसरली.

मी उठलो नाही. उंचच उंच सागाच्या झाडाआडून सूर्य भरभर खाली सरकत होता. तो खाली गेलो. काळोखात सगळं जग बुडालं जात होतं. त्या भयाण शांततेत माझं मन करपून गेलं. मी आता एकाकी पडलो होतो. पूर्ण निराधार बनलो होतो. मरणाहून दुसरं काही माझ्याकडे शिल्लक नव्हतं.

त्या परिस्थितीत मला चटकन घरची आठवण झाली. माझी आई, माझी बहिण, माझे सगेसोयरे सगळे सगळे माझ्या डोळ्यासमोरून गेले. आघाडीवर निघताना किती तरी सुंदर तरुणींनी आम्हाला ' गुड लक ' इच्छिले होते. आम्ही दृष्टिआड होईपर्यंत त्यांचे हवेत उंचावलेले हात आम्हाला दिसत होते. माझ्या ' ओइसो ' या छोट्या गावातील प्रत्येकाला मी आघाडीवर जात आहे याचा अभिमान वाटत होता. आणि आज–

कोफू येथील " ६३ पूर्व लष्कर विभागात " मी जेव्हा सामिल झालो तेव्हा आमच्यापैकी सर्वांना विजयाची खात्री होती. मी आणि माझे काही साथीदार मिळून आम्ही प्रशिक्षणासाठी मांचुरियाला होतो. दिवसा मागून दिवस निघून गेले आणि आम्ही तरबेज बनलो. प्रत्यक्ष युद्ध आघाडीवर कधी जायला मिळते यासाठी आमच्या हातात बळ संचारलं होतं.

आणि अचानक आम्हाला आघाडीवर पाठविण्याचा हुकूम आला. तो १९४४ चा मार्च महिना होता. आमच्या तुकडीची बांधणी नव्यानेच झाली होती. योकोहामा उपनगरापासून तो थेट मरियानापर्यंतचा प्रदेश आमच्या संरक्षणाखाली रहाणार होता. मार्च २१ ला आम्ही गुयामला प्रयाण केले. मारियाना विभागातील गुयाम हे सर्वात मोठं बेट होतं. निमुळता आकार असलेलं हे बेट दक्षिणोत्तर ५० किलो मिटर्स एवढेच असेल. बेटांवर आम्ही जेव्हा पाय ठेवला तेव्हा इनाडा नदीच्या परि-सरात आम्ही मुक्काम ठोकला. मेच्या सुरुवातीपर्यंत आम्ही बेटाच्या चारी बाजूला विखुरलो गेलो होतो.

आता तब्बल सहा महिन्यानंतर मी असहाय बनलो होतो. मी माझीच सांत्वना केली. मन घट्ट केलं. सूर्य मावळून आता बराच वेळ झाला होता आणि काळोखात सगळं जग बुडून गेलं होतं. मी जवळचा पालापाचोळा एकत्र केला आणि त्याच्या उबदार अंथरुणात झोपून गेलो.

सकाळी मला जाग आली ती वातावरण छेदत जाणाऱ्या रायफलच्या गोळीने.

मी धडपडून उठलो. धावतच टेकडीच्या पायथ्याशी आलो. खडकाच्या आडोशाने टेकडीच्या वर आलो. एका मोठ्या दगडाच्या आडोशाला दबा धरून बसलो. टेकडीच्या दुसऱ्या भागांच्या साधारण मध्यभागी एक लाकडाच्या ओंडक्यासारखी मोठी गोष्ट दिसली. माझी जिज्ञासा ताणली गेली. मी धीर धरून पुढे सरसावलो. त्याकडे प्रत्यक्ष जाऊन पहाण्यापूर्वी मला कळून चुकलं की, ते एका ऑस्ट्रेलियन सैनिकाचे प्रेत होते.

मला तरीही जवळ यायला भीति वाटली. जवळ गेलो. तो अस्ताव्यस्त पडला होता. त्याला मी ओणवा फिरविला. त्या परिस्थितीतही त्याच्या हातातील रायफलची पकड सैल झाली नव्हती. मी त्याच्या हातून रायफल ओढून घेतली. त्या मृत देहाच्या हातून ती रायफल घेताना मला किती यातना झाल्या. त्या रायफलची मी पहाणी केली. आठ जिवंत काडतुसे मला मिळाली. त्या रायफलने मला बराच धीर आला.

जवळजवळ दोन आठवडे भुकेने मी व्याकुळ झालो होतो. भयंकर भुकेने माझं पोट आणि पाठ जणू चिकटल्यासारखी झाली. मला काहीच सुचेना. भ्रमिष्टासारखी माझी स्थिती झाली. विश्रांती न घेता वाट फुटेल तिकडे मी जाऊ लागलो. वाटेत जी फळे मिळत होती ती तोंडात टाकून भूक भागवित होतो.

पण अचानक एका संध्याकाळी माझं सारं अवसान गळून पडलं. माझ्याच रोखाने कोणीतरी येत आहे याची मला स्पष्ट चाहूल लागली. मी जमिनीचा आधार घेऊन पडलो. श्वास रोखला गेला. येणाऱ्या माणसांच्या पायांचा आवाज आता स्पष्ट येऊ लागला. एका झुडपाच्या सावलीआड तो आवाज स्थिरावला. दोन माणसांच्या पायांचा तो आवाज होता. मी उठलो. धीर धरून त्या व्यक्तींवर नजर रोखण्याचा प्रयत्न केला. त्या दोघांपैकी कुणापाशीच हत्यार दिसत नव्हते.


"अच्छा, म्हणजे ते जपानीच सैनिक असले पाहिजेत." मी मनाशी विचार केला. मी त्यांचा पाठलाग सुरू केला. अजूनही माझी छाती धडधडत होती. पन्नास पावले पुढे गेल्यावर ते एकदम दिसेनासे झाले. कदाचित् गुहा असली पाहिजे असा विचार मनात आला. मी बराच पुढे आलो. खरोखरच पुढे गुहा होती. चार-पाच मिटर रुंदी असलेल्या त्या गुहेपाशी मी उभा राहिलो. हळू आवाजात म्हणालो,

"अमेरिकन की जपानी ? तुम्ही जपानी आहात काय ?"

उत्तर आलं नाही. मला अजूनही खबरदारी घ्यायला हवी होती. माझ्या हातात असलेली रायफल सज्ज होती.

"शत्रू की मित्र ?" मी परत एकदा तातडीने प्रश्न विचारला.

शेवटी एकदाचं उत्तर आलं. "आम्ही जपानी आहोत." आणि त्याचबरोबर त्या काळोख्या गुहेतून दोन व्यक्ती एका पाठोपाठ एक बाहेर पडल्या. दोघांची तोंडे मी न्याहाळली. माझ्याच तुकडीची ती माणसे होती.


चीन
जपान
पॅसिफिक महासागर
फिलिपाईन बेटे
गुयाम
बोर्निओ
न्यू गिनी
ऑस्ट्रेलिया
उत्तर
अगाना
अप्रा बंदर
तलोफोफो
गुयाम

सभोवतालचा प्रदेश

माझ्या या साथीदारांची नावे होती मिनाकावा बंझो आणि मियाझावा टोकुसावरो. ते तोफांसाठी चर खणण्याच्या कामगिरीवर होते. अमेरिकनांनी जेव्हा गुयामच्या बेटावर जोरदार हल्ला चढविला त्याच दिवशी त्यांचा दारूगोळा संपला आणि जीव वाचविण्यासाठी अरण्यात लपतछपत दिवस काढण्याची त्यांच्यावर पाळी आली

मला आलेले सगळे रोमांचकारी अनुभव मी त्यांना सांगत होतो. मागील दोन आठवडे भुकेने कसा होरपळून निघालो आहे याची त्यांना कल्पना आली.

"आता यानंतर–" मी म्हणालो, "आपण तिघांनी एकत्र रहायचं का?"

"चालेल ना!" मिनाकावा म्हणाला. मियासावाने त्यास संमती दिली.

गुहा बरीच ऐसपैस होती. वीस माणसे आरामात राहू शकतील एवढी ती मोठी होती. त्यात मोकळेपणे वावरता येईल असा तिचा आकार होता. पण त्याचबरोबर ती तेव्हढी सुरक्षित नव्हती संकटकाळात झटपट पळायला दुसरी पळवाट नव्हती. समोर कोणताच आडोसा नव्हता. आम्ही तिघांनी मिळून पुष्कळ विचार केला. गुहेपासून शंभर मिटर अंतरावर असलेल्या गर्द झाडाझुडपांच्या आधाराने रहायचे असं ठरविलं. दोन्ही जागा वापरायच्या अशी आखणी आम्ही केली.

जपानच्या आरमारातील एका मोडलेल्या गलबताचा एक बराच मोठा पत्रा आम्हाला मिळाला होता. त्याचा छप्पर म्हणून उपयोग करण्याचं आम्ही ठरविले. जवळच्या झाडाझुडपातून लाकडे, काठ्या आणून झडपातच एका खोलीसारखी जागा तयार केली. एका बाजूला एक मोठं भाग ठेवून आम्ही सरपटत आत किंवा बाहेर जात येत असू.

काही काळ निघून गेल्यावर आमच्या बाजूलाच एक जपानी पथक वावरताना आम्हाला दिसले.

त्यांनी आपल्या बरोबर आम्हाला रहायची विनंती केली. पण सुरक्षिततेच्या दृष्टीने आम्हाला ते योग्य वाटलं नाही. आम्हाला जीवंत रहायचे होते. केवळ जपानी मदतीची वाट पहात अमेरिकन सैन्याचा प्रत्यक्ष प्रतिकार न करता त्यांना हुलकावणी देण्यापलिकडे आम्हाला दुसरं काही करता येणार नव्हतं आणि खऱ्या अर्थाने ते शक्यही नव्हतं.

या प्राथमिक काळात आम्हाला दोनच गोष्टींची आवश्यकता भासत होती. एक अन्न आणि दुसरी अन्न शिजवायला जरूर ती भांडी. अन्न म्हणजे फळे आणि कंदमुळाखेरीज दुसरं काही आम्हाला मिळण्यासारखं नव्हतं. रानात एक कांदा मिळत असे. तो साधारण बटाट्यासारखा लागायचा. त्याचा आम्हाला अतिशय उपयोग होऊ लागला. नारळ त्या बेटावर विपुल मिळायचा. त्यापासून आम्ही जपानी सूपासारखा पदार्थ बनवित असायचे. झऱ्याचं निर्मळ पाणी पिण्यासाठी उपयोगात आणावे लागे.

जे काही पोटात घालत होतो ते पहिले काही दिवस प्रयोगाच्या दृष्टीने आणि परिस्थितीला लागून चालण्यासारखं होतं. पण काही दिवसांनी आम्हाला हगवणी-पासून वारंवार त्रास होऊ लागला. खबरदारी घेण्यासाठी आम्हाला अन्नात बदल आणि पाणी उकळून प्यावं लागणार होतं.

पण आमचा हा कोंडमारा एके दिवशी चटकन् सुटला. आमची दुसरी जपानी माणसे कुठं दिसतात काय आणि दिसल्यास त्यांच्याकडून काही आवश्यक गोष्टी मिळू शकतील म्हणून त्यांच्या शोधासाठी आम्ही तिथे बाहेर पडलो. मुख्य रस्त्याने आम्ही बरेच चालत पुढे आलो. एवढ्यात दूरवरून येणाऱ्या वहानाची आम्हाला घरघर ऐकू येऊ लागली. आम्ही झाडीत दडून बसलो. आमच्या समोरून एक ट्रक धडधडत निघून गेला. त्यात कचरा भरला असल्याचे आम्ही पाहिले. त्याकडे बघितल्यावर मियाझावाच्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली.

"अमेरिकन हा कचरा कुठं फेकतात ते आपण प्रत्यक्ष पाहिल्यास बरं होईल." तो म्हणाला.

मला ते आवडलं नाही. त्यात कसा धोका आहे हे त्याला मी समजावण्याचा प्रयत्न केला.

"धोका तर घ्यायलाच हवा." तो म्हणाला. "नाहीतर सहा महिन्यातच आमची हाडं या जंगलात फेकली जातील."

काळोख पडला आणि आम्ही तयार झालो.

त्या कचऱ्यात कितीतरी अत्यावश्यक गोष्टी आम्हाला आढळणार होत्या. तेथून निवडक गोष्टी निवडण्यासाठी बऱ्याच रात्री आम्ही खर्च केल्या. टिनचे रिकामे डबे अन्न शिजविण्यासाठी, मोठ्या टाक्या पाणी साठविण्यासाठी आम्हाला उपयोगात आणण्याजोग्या होत्या. एक तोफखान्यातील ॲल्युमिनियमची बरीच मोठी पेटी आम्हाला मिळाली. ती जवळजवळ चार फूट लांब होती. तिला वरच्या बाजूला रबरी आवरण असल्यामुळे त्यावर घट्ट झाकण बसविता येई त्यामुळे त्यात बरेच दिवस अन्न साठविता आले असते.

त्याशिवाय मोडलेले चाकू, सुरे, हातोडे, आम्ही उचलले. त्यांचाही बराच उपयोग होणार होता. ही सर्व साधने आम्ही गुहेत ठेवली. टहळणी पथकाने कदाचित हल्ला केलाच तर ही साधने तरी गुहेत सुरक्षित राहतील, शिवाय आमचा पत्ताही लागण्याची शक्यता नव्हती. स्प्रिंगच्या तुकड्यापासून आम्ही सुई बनविली आणि दोरखंडापासून दोरा बनवून आमच्या फाटक्या कपड्यांना ठिगळं लावली. जुन्या तंबूच्या कपड्यापासून पांघरुणे तयार केली आणि जीपच्या तुटलेल्या टायरचे सँडल तयार केले. ते बनविताना त्यांचा आकार आम्ही पायापेक्षा मोठा बनविला. एक तर त्यापासून चालण्याचा आवाज येऊ नये आणि दुसरं म्हणजे पायाच्या खुणा

पृष्ठ ३४ वर

# दलित साहित्य संमेलन

## महाड

प्रा. रा. म. बिवलकर

निवडणुकीच्या रणधुमाळीत साहित्य संमेलनाची टिमकी कुणाला ऐकू जावी ? आणि त्यातही महाडसारख्या आडबाजूच्या कोकणी शहरवजा गावात भरलेले ते बौद्ध साहित्य संमलेन ! तीन वर्षापूर्वी मुंबईच्या महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभेने प्राचार्य म. भि. चिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पहिल्याने बौद्ध साहित्य संमेलन भरविले, तेव्हाही बौद्ध साहित्य संमेलन म्हणजे कुणाचे ? बौद्ध साहित्य काय निराळे असते ? चांद्यापासून बांद्र्यापर्यंतच्या भागातील मायबोली मराठीचे समेलन प्रतिवर्षी भरतेच की ? हा आणखी नवा सवता सुभा कशाला हवा ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाच्या समाजजीवनात नेहमीच निराळा सूर लावला. आता त्यांचे अनुयायीही साहित्यात असा सूर लावू पाहात आहेत का ? असे अनेक प्रश्न विचारले गेले. महाराचे नवबुद्ध झाले तरी बुद्धवाडे गावाबाहेरच राहिले, तद्वत् बौद्ध साहित्यिकाना आपला ' वाडा ' निराळा ठेवायचा आहे का ? असाही कुत्सित प्रश्न विचारला गेला. पहिल्या संमेलनाला तीन वर्षे उलटली तरी दुसरे भरले नाही–श्री. दादासाहेब रुपवत्यांच्या भाषेत ' पाळणा घोडीपेक्षाही लांबला, ' तेव्हा बौद्ध साहित्यिक अस्वस्थ झाले. इतरांना वाटले या मंडळींची उर्मी निवली !

पण सभेच्या अध्यक्षानी श्री. घनःशाम तळवटकरांनी यंदा जोर धरून साहित्य संमेलन भरवायचा चंगच बांधला आणि १३, १४ फेब्रुवारी रोजी ते महाडला भरलेहं'.

महाड म्हणजे बौद्ध जनतेचे स्फूर्तिस्थान, तीर्थक्षेत्र. गंगोत्रीचे महत्त्व आहे या गावाला. कारण डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक व राजकीय जीवन सुरू करणारा पहिला लढा इथे दिला गेला. चौदा तळ्यावर पाणी पिण्याचा हक्क बजावण्याकरता १९२७ सालचा चौदार तळ्याचा सत्याग्रह म्हणजे प्रेतवत् पडलेल्या कोट्यावधी अस्पृश्य जनतेच्या शरीरात प्राण फुंकणारे रणशिंग होते. मुक्ति संग्राम होता.

मनुस्मृतीची होळी होती. माणसाला माणूस म्हणून जगता यावे याकरता उभे केलेले ते जंग होते. दुसरे बौद्ध साहित्य संमेलन या मुक्तिनगरातील 'मुक्ति संग्राम नगरात' भरावे यात औचित्य खास होते. बडया बडया साहित्यिक मंडळींना निमंत्रण दिले होते. पण कुणाही मंत्र्याला पाचारिले नव्हते !

प्रत्यक्ष संमेलनाला स्पृश्य समाजातील फारशी मंडळी आली नाहीत, तद्वत् बौद्ध साहित्यिकांपैकीही काही मान्यवर मंडळी येऊ शकली नाहीत. पहिल्या वर्गातील मंडळीच्या न येण्यात उपेक्षेचा भाग असेल पण दुसऱ्या वर्गातील न आलेल्या साऱ्यांनाच महत्त्वाची कामे खोळंबून पडली होती असे म्हणता यायचे नाही.

संमेलनाची सुरवात मोठी शानदार झाली. ४४ वर्षापूर्वी, डॉ. बाबासाहेबांनी ज्या चौदार तळयाच्या घाटावर आपल्या अनुयायांसह पाणी पिण्याचा सत्याग्रह केला त्या पाण्याला स्पर्श करून संमेलनार्थ जमलेल्या मंडळींनी डॉक्टर बाबासाहेबांच्या 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथराजाची मिरवणूक काढली—' मुक्तिसंग्राम नगरापर्यंत. मिरवणुकीचे नेतृत्व प्राचार्य म. भि. चिटणीस, श्री. तळवटकर, श्री. मोहिते गुरुजी, प्रा. वा. ल. कुलकर्णी यासारख्या मान्यवरांनी केले. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विख्यात कथाकार श्री. बाबुराव बागूल, महाडला उशीरा पोचल्याने ते या मिरवणुकीत सामील होऊ शकले नाहीत.

मिरवणूक संमेलन स्थानी आल्यावर तिचे सभेत रूपांतर झाले. स्वागत गीत, बुद्धवंदना, स्वागताध्यक्षांचे भाषण, संदेशवाचन हे चाकोरीतील कार्यक्रम आटोपल्यावर सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी भगवान् बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमांना हार घालून त्यापुढे दोन मेणबत्त्या प्रज्वलीत करून, संमेलनाचे उद्घाटन केले.

## 'फॅक्ट्सचा पाया'

आपल्या उद्घाटनाच्या भाषणात प्रा. वा. ल. म्हणाले, " मराठी साहित्य संमेलन प्रतिवर्षी भरत असता, या बौद्ध साहित्य समेलनाची आवश्यकता काय ? असा प्रश्न विचारणाराना मला हे सांगितले पाहिजे की अशा संमेलनाची फारच आवश्यकता आहे असे माझे मत पूर्ण विचारांती बनले आहे. दलित समाजाला नवी जाग आली आहे. नव्यानेच ते बोलू लागले आहेत. महाभयंकर वेदना, अन्याय यांचा खराखुरा अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात नवा आशय येत आहे. मराठी भाषा समृद्ध करण्याकरता म्हणूनच या संमेलनाची नितांत आवश्यकता आहे. आजच्या वाङ्मयीन आदर्शाच्या ढाच्यामध्ये वा शैलीच्या दृष्टीने त्यांची कविता, कविता आहे का ? कथा, कथा आहे का ? असले प्रश्न समीक्षक विचारतील, तर त्यांना न जुमानता या मंडळींनी लिहीत राहिले पाहिजे. जुने आदर्श ढाचे, शैल्याही सगळी बधने झुगारून, उच्छेदून त्यांनी आपले नवे आदर्श उभे करावेत. वाङ्मयाच्या मंत्र-तंत्र-शैली-आदर्श यांची यातून पडझड होईल पण ती मराठी

साहित्याचा विकासच करील. आजचे मराठी साहित्य 'फॅक्ट्स्'पासून फार दूर आहे. अतिरंजित स्वरूपाचे आहे. तिथे जुने सांस्कृतिक कालबाह्य आदर्श अजून चालतात. त्यामुळे ते दुर्बळ झाले आहे. बौद्ध साहित्याला फॅक्ट्स्चा आधार आहे. हा फॅक्ट्सचा पाया मराठी साहित्य मजबूत करील."

भाषणाच्या शेवटी वा. ल. म्हणाले, "पण बौद्ध साहित्यात एक उणीव आहे त्याचाही मी उल्लेख करायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर, या साहित्यातील वैचारिक बाजू फारच कमी पडत आहे. बौद्ध आणि दलित समाजात अनेक न्यूनगंड निर्माण झाले आहेत. या न्यूनगंडाविरुद्ध बंड पुकारण्यासाठी विचारांची बैठक हवी. त्याकरता बौद्ध साहित्यिकांनी आत्मपरीक्षा करावी, आत्मचिकित्सा करून स्वतःचे टीकाकार व्हावे. एकोणीसाव्या शतकात लोकहितवादींनी आणि सुधारकाग्रणी आगरकरांनी सुधारणेकरता आपल्याच जातीचे म्हणजे ब्राह्मणाचे जसे वाभाडे काढले तसे बौद्ध विचारवंतानी केले पाहिजे."

वालंच्या भाषणामुळे संमेलनाला सूर तर छान लागला. उद्घाटनानंतर मावळते अध्यक्ष प्राचार्य म. भि. चिटणीस यांच्या हस्ते 'स्मरणिकेचे,' 'आम्ही'च्या संमेलन विशेषांकाचे आणि श्री. ज. वि. पवार यांच्या 'बलिदान' नामक कादंबरीचे प्रकाशन झाले.

संमेलनाध्यक्ष श्री. बाबुराव बागुल यांनी आपले भाषण वाचून दाखविले. त्यांच्या भाषणात तळमळ होती, चीड होती, ती क्षणोक्षणी व्यक्त होत होती. दलित साहित्य म्हणजे दलितांच्या दुःखाचेच दुसरे रूप. विषय माणूस. परंपरेने सामाजिक चौकटीत पिचून गेलेला, मोडून पडलेला, नेस्तनाबूत झालेला. या साऱ्या दलित समाजाला वर्णाश्रमाच्या पोलादी चौकटीत डांबून टाकणारी धर्माधिष्ठित समाज व्यवस्था आणि तिला साहाय्यभूत होणारी राज्ययंत्रणा, तथाकथित समाज सुधारक, विचारवंत, आणि संत महंत या सर्वांविषयी बाबूरावांनी मांडलेले विचार, स्पृश्यांना जळजळत जाणारे होते. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने अस्पृश्य समाज जागा झाला. लढायला सिद्ध झाला. जिद्दीने बोलू लागला. लिहू लागला. त्यांचे साहित्य संकुचित नाही, वंशवादी नाही, अतिरंजित तर नाहीच नाही. स्वतःचा सवता सुभा निर्माण करणारे असूनही ते व्यापक आहे. या साहित्याचा विषय आहे माणूस. म्हणूनच हे साहित्य देशाला मोठे मानते, धर्मालाही मोठे मानते पण त्याहूनही त्याला माणूस–माणुसकी मोठी वाटते. डॉ. बाबासाहेबांनी दलित माणसाला प्रथम डिवचले. जागे केले. त्यापूर्वीही तसे प्रयत्न झाले होते. पण तिथे अन्यायाची जाणीव नव्हती, फक्त सहानुभूती होती. अर्थातच ते तोकडे पडले. म्हणूनच दलित समाज जागा होऊ शकला नाही. 'बंधूंनो, बाबासाहेब अवतरण्यापूर्वी आपण एकच काळोखाचे कैदी होतो. एकाच दुःखात पिचत होतो. आपल्याला आज प्रकाश मिळाला आहे. पण अस्पृश्यता संपलेली नाही. दुःख संपलेले नाही. दारिद्र्य पाठ सोडायला तयार नाही; आणि

म्हणून दलित साहित्यही संपणार नाही. अस्पृश्यतेशी आणि दास्याशी, विषमतेशी आणि दु:खाशी, दलित साहित्याचे वैर आहे. माणसाच्या मुक्तीच्या पुरस्कार करणारे, माणसाला महान् मानणारे, वंश, वर्ण आणि जाती यांच्या श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य असते, ते दलित साहित्य असते. मराठीचा लेखक वर्गही फार हिंदू आहे. आणि तो फार हिंदू असल्याने गावाजवळच्या महार-मांगवाड्यात तो कधी डोकावला नाही. तो फक्त सदाशिव पेठी वाङ्मयच लिहित राहिला. आमचा महाडचा मुक्तिसंग्राम, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, कथाकादंबऱ्यांचा विषय झाला नाही. याचे कारण लेखक अनुभव घ्यायलाही भितात; आणि वाचकालाही दचकून असतात. लेखकांचे पारंपरीक संस्कार त्यांना रोखतात. दलित साहित्याने हे संस्कार झुगारून दिले आहेत. म्हणूनच आम्ही माणसाचे, त्याच्या सुखदु:खाचे, वासना भावनाचे, ठसठशीत चित्रण करू शकतो, त्यातून मराठी माय-बोलीत खूप खूप शब्द आणि प्रतिमा जरूर येईल.'

श्री. बाबुरावांनी आपले विचार मांडलेही चांगले. म्हणून मोठा गोडा वाटला. त्याच रात्री, औरंगाबादच्या 'अस्मितादर्श' नामक साहित्यविषयक त्रैमासिकाचे संपादक गा. गंगाधर पानतावणे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. या कविसंमेलनात सर्वश्री वामन निंबाळकर, शिवराम देवलकर, नीलकांत चव्हाण, प्रा. यादवराव गांगुर्डे, प्रा. त्रिशील गायकवाड, दत्ता पवार, दिनेश लखमापूरकर, अर्जुन डांगळे, चोखा कांबळे, अनंत कांबळे, राजा राजवाडे, नारायण सुर्वे, ज. वि. पवार, शशिकांत लोखंडे या नव्या दमाच्या कवींनी खूपच रंग भरला. त्यांना उत्तम साथ दिली महाडातल्या कविमित्र मंडळाने. कविमित्र मंडळाच्या प्रा.



राम विवलकर, बाबुराव रानडे, प्रा. सरोज कुमार जाधव, श्री. मुरलीधर मोरे आदि मंडळींनी आपापल्या कविता छान सादर केल्या. साहित्य संमेलनाच्या दिवशीच मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांची निवडणूक प्रचार सभाही महाडात झाली. त्यांचा मुक्काम मुक्तिसंग्राम नगराच्या समोरच असलेल्या सरकारी विश्रामधामात असल्याने ११ वाजता माईक बंद करावा लागला आणि त्यामुळे कविता सादर करणाऱ्या कवींना खूपच घसाफोड करावी लागली. कविसंमेलनाच्या सुरुवातीला लोकशाहीर श्री. वामनराव करडक यांचा शाल, श्रीफल आणि 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाची प्रत भेट देऊन, अध्यक्ष श्री. बाबुराव बागूल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दोन यत्ताही न शिकलेला हा लोकशाहीर–पण त्याने आपल्या गीतानी भल्याभल्यांना मानायला लावले आहे.

## दोन आघाड्या मार्क्स आंबेडकर

दुसऱ्या दिवशी ओळख समारंभ, रंगावली–प्रदर्शनाचे उद्घाटन, आदि कार्यक्रम झाल्यावर रंगला तो परिसंवाद. विषय होता 'दलित साहित्याच्या जाणीवा आणि प्रेरणा.' परिसंवादाचे अध्यक्ष होते प्राचार्य मनोहर चिटणीस. गेली दोन तीन वर्षे साहित्य जगतात हा विषय चर्चिला जात आहे. त्या संदर्भात याच विषयावर संमेलन प्रसंगी परिसंवाद आयोजिणे औचित्यपूर्ण होते. परिसंवादात अनेकांनी भाग घेतला. प्रा. झुंबरलालजी कांबळे म्हणाले, "दलितांच्या जीवनावर जेव्हा दलितेतर लेखक लिहितात तेव्हा त्यांच्या लेखनातून दलितासंबंधीचे त्यांचे ठाम पूर्वग्रह व्यक्त केले जातात. अनेकवेळा नव्हे बहुदा त्यांचे विचार चातुर्वर्ण्याला धुडकावून लावू शकत नाहीत. हा दलितावर अन्याय होतो. दलित साहित्याची प्रेरणा आहे. डॉ. बाबासाहेबांनी करून दिलेली माणुसकीची जाणीव, बौद्ध धर्माने दिलेली 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' ही उदारधी वृत्ती. त्यामुळ दलित साहित्य संकुचित तर नाहीच नाही किंवा त्याच्या प्रेरणा नीग्रो साहित्यावरही आधारलेल्या नाहीत. दोन्ही साहित्यांतील दुःखाचा पोत फार तर सारखा दिसतो असे म्हणता येईल." यानंतर डॉ. सदा कऱ्हाडे उठले. त्यांना दलित या शब्दाचा अर्थ अधिक व्यापक हवा होता. त्यात नवबौद्धांशिवाय इतर दलितांचा समावेश व्हावा असे त्यांचे म्हणणे होते. दलितांचे जीवन साहित्यात व्यक्त करण्याकरता दलित लेखकच हवे। हा मुद्दा त्यांना पटला नाही. कारण साहित्य हे कुणाही जातीजमातीचे असूच शकत नाही. साहित्याने समाज जागृती प्रभावीपणे करता येते तेव्हा ती जागृती करण्यासाठी दलितेतर लेखकांनीही दलित जीवनावर प्रामाणिकपणे लिहिल्यास तेही दलित साहित्य होऊ शकेल. असा त्यांच्या भाषणाचा सूर होता.

संमेलनाध्यक्ष श्री, बाबुराव बागूल यांनीही परिसंवादात भाग घेतला. "आम्ही जे जीवन जगतो ते दाहक असते. जी दुःखे भोगतो तीही दाहक असतात. ज्या स्वरूपात आम्ही ती भोगतो–अनुभवतो त्याच स्वरूपात आम्ही ती मांडण्याचा

प्रयत्न करतो. दलितेतर लेखक अनुभवाविणा हे करू शकत नाहीत. ‘दलितांचे साहित्य’ असा शब्दप्रयोग करण्यात आम्हाला आमचा वेगळेपणा व्यक्त करायचा आहे.”

त्यानंतर उठलेल्या प्रा. सुभाष सोमण यांनी दलित हे दलित असण्याचे मुख्य कारण आर्थिक आहे असे सांगून आर्थिक परिस्थितीच्या रगाड्यात पिचून निघणाऱ्या दलितांच्या साहित्याने वरच्या वर्गातील लोकांविरुद्ध बंड पुकारावे आणि ही आर्थिक विषमताच नष्ट करण्यास झटावे तरच दलितांचे जीवन सुखी होईल असे ठासून सांगितले. प्रा. सोमण यांच्या मुद्द्याला विरोध करताना रावसाहेब कसबे म्हणाले, “आम्ही दलित हे केवळ पैशाने दलित नाही. जातीभेदांच्या भिंतीमुळे आम्ही अधिक दलित व पतित भासतो. दलिताने खूप पैसा मिळवला म्हणून त्याचे दलितपण अगर अस्पृश्यपण जात नाही. म्हणून आमचा प्रहार जातिभेदांच्या तटबंदीवर. भांडवलदारांच्या विरुद्धचा लढाही आम्हाला हवा आहे—तो तुम्ही करा. आम्ही या आघाडीवर लढतो कारण मार्क्सवाद ही तुमची स्फुर्ती तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन ही आमची स्फूर्ती. या दोहोंचा समन्वय करून दोन्ही लढे आपण लढू. म्हणजे तुमचा आणि आमचाही उद्धार होईल.”

याशिवाय श्री. प्र. श्री. नेरूरकर, श्री. हरिभाऊ पगारे, श्री. डी. टी. माने यांनीही या परिसंवादात भाग घेतला. एकूण अडीच तास परिसंवाद रंगला. प्राचार्य म. भि. चिटणीस यांच्या छोट्या भाषणाने त्याची सांगता झाली. प्राचार्य चिटणीसांवर वेळेच्या बंधनाने अन्याय केला.

सायंकाळी सहाला पत्रकार परिषद सुरू झाली. अध्यक्ष होते श्री. भा. र. कद्रेकर हे वयोवृद्ध संपादक. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात जी अनेक वृत्तपत्रे—मतपत्रे काढली त्यांचे सव्यसाची संपादक. स्वतः दलितेतर असूनही डॉक्टर-बाबासाहेबांबद्दल अतीव श्रद्धा व प्रेम असलेला हा गृहस्थ. त्यांचे भाषण अनेक ऐतिहासिक संदर्भांनी भरलेले होते. डॉ. आंबेडकरांनी १९२० साली सुरू केलेल्या ‘मूकनायक’ पासून १९५६ साली सुरू केलेल्या ‘प्रबुद्धभारत’ पर्यंतच्या सर्व वृत्त-पत्रांचा उद्देश, कार्य, वैशिष्ट्य यावर त्यांनी विवेचन केले. २७ सालच्या डॉ. बाबा-साहेबांच्या चवदार तळे सत्याग्रहात सामील झालेला हा सैनिक अनेक आठवणी सांगता सांगता गद्गदून येत होता. डॉक्टर साहेबांना आपली मते प्रसिद्ध करण्या-करता दरवेळी कशी नवनवी वृत्तपत्रे निर्माण करावी लागली; हा सर्व इतिहास अत्यंत हृदयस्पर्शी शब्दात कद्रेकरांनी जिवंत केला. पत्रकार परिषदेत भाग घेणारे इतर सर्व पत्रकार त्यामुळे भारावून गेले. श्री. कद्रेकरांच्या भाषणानंतर श्री. भास्कर माधव, वामन निंबाळकर, म. दु. ताम्हणेकर, डॉ. श्रीधर ओव्हाळ, प्रा. गंगाधर पानतावणे वगैरे पत्रकारांनी आपले विचार मांडले. त्यांतून आजच्या भांडवलदारांच्या साखळीपत्रांवर कडाडून हल्ला झाला. ही वृत्तपत्रे अस्पृश्यांच्या दुःखाला कधीही वाचा फोडीत नाहीत, खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करतात याबद्दल सर्वांचे एकमत


दिसले. आमच्या समाजाच्या दुःखाना वाचा फोडायला स्वतंत्र व समर्थ वर्तमान-पत्राची आवश्यकता आहे असे साप्यांनीच बोलून दाखविले.

## कार्यक्रमांची भाऊगर्दी

त्यानंतर प्रबंध वाचनाचा कार्यक्रम होता. त्यात प्रा. देवदास रामटेके (बौद्ध साहित्याचा प्रभाव), प्रा. ए. के. मोरे (प्राचीन बौद्ध विद्यापीठे), प्रा. प्रभाकर गणवीर (बौद्ध साहित्य : एक सामाजिक दृष्टिकोन) यांनी भाग घेतला. सर्वांनी प्रबंधांवर मेहनत घेतली होती. पण अनेक कार्यक्रमाना वेळ अपुरी पडत होती. इतक्या कार्यक्रमांची गर्दी दोन दिवसात नको होती असे वाटले. कारण मग कुठल्याच कार्यक्रमाला न्याय मिळत नाही. उदाहरणार्थ प्रबंध वाचनानंतर असलेल्या खल्या अधिवेशनात थकावटीमुळे अनेकाना रसच उरला नाही. अनेक ठराव तावा-तावाने मांडले गेले. पासही झाले. ठरावाची कार्यवाही ठरायला हवी. ती ठरलीच नाही. 'पाली भाषेला शिक्षणात महत्त्वाचे स्थान असावे' हा ठराव ते का, कसे मिळवून देता येईल. कुणी प्रयत्न करायचा ? ठरायला नको का ? 'लोकशाहीर श्री. वामन करडक यांना सरकारने मानधन द्यावे' हा असाच दुसरा ठराव. त्यामुळे श्री. करडक यांना फार तर बरे वाटेल. पुढे काय ?

रात्री गीत बुद्धायनाचा कार्यक्रम होता तो साहाजिकच ९॥ ऐवजी रात्री ११ ला सुरू झाला. 'त्रिवेणी कला संगम' काळा चौकी, मुंबई या संस्थेने तो सादर केला. कवी व गायक होते श्री. संजय जाधव, गीताना स्वरसाज चढविला होता श्री. लक्ष्मण थोरात यांनी. कार्यक्रम उत्तररात्रीपर्यंत चालला होता.

बौद्ध साहित्य सभेच्या दुसऱ्या साहित्य संमेलनाचे नेहमीप्रमाणे सूर वाजून पुन्हा चाकोरीबद्ध जीवन सुरुही झाले आहे. निवडणुकीच्या झंजावाताने महाडला पेटलेले थोडेफार निखारे प्रज्वलीत व्हायच्या ऐवजी राजकीय स्वार्थांच्या प्रवाहात मिळून गेले तर पुन्हा कोळसे होतील याची जाण समाजाने ठेवायला हवी. पण ती राहात नाही हा आजवरचा इतिहास आहे–नाही का ?



# प्रश्नचिन्ह?

प्रकाश मेवककर


माझं नाव यशवंत विनायक गुप्ते.

वंशपरंपरागत चालत आलेल्या कुळाचा वंशज! असं म्हणतात की, नातवाचा चेहरा आजोबासारखा असतो. तसा मी बराच हॅंडसम आहे असं बाहेरच्यांचं मत आहे पण माझा आजोबा कोण हेच मुळी मला आठवत नाही. आजोबाचंच काय बापसुद्धा!

—तसं फुलपाखरी बालपण अनाथ आश्रमाच्या गजाआड गेले. त्यामुळं आईबाप नावाचे प्राणी माझ्या हिशेबी नाहीत. असा एक प्रवाद आहे की, हे दोनही प्राणी आपल्या अपत्यावर जीवापाड प्रेम करतात. म्हणजे नेमके काय करतात? का करतात? या अशा अनेक काटेरी प्रश्नांचे एक मोठे मोठे होत जाणारे गतीमान असे वर्तुळ अन् त्यात सापडलेला मी, यशवंत विनायक गुप्ते...?

आजपर्यंतच्या आयुष्यात मला ठाऊक असलेलं एकच प्रेम! कॉलेजला होतो त्या गुलमोहोरी, धुक्याआडच्या स्वप्नाळलेल्या दिवसातलं! माझ्या वर्गातली मेरी डिसूझा माझ्या निळ्या डोळ्यांवर खूप खूप प्रेम करायची म्हणे! असं मला गोखल्यांचा नन्या सांगायचा. तिच्या प्रेमाची कृतिनिष्ठ पावती म्हणजे तिनं माझ्या डोळ्यांची एकांतात घेतलेली असंख्य ओशट, बुरसट चुंबने!

तस्सच गुजराथ्याच्या नरेन बेनचं झालं. ती म्हणायची की, मी एकदम जेम्स बॉंड दिसतो. ती परेडसमध्ये, टेनीसकोर्टवर सारखं एकटक माझ्याकडं पाहायची. खूपसं खोल खोल अर्थ असणारे उष्ण निश्वास टाकायची. तिच्याबरोबर मी मोठ-मोठ्या पॉश, चकचकीत हॉटेल्समध्ये गेलो. कटलेटस खाल्ले. फॅमिली रूमच्या निळ्या मंद प्रकाशात तिचे बदबदीत दंड माझ्या खांद्यांना घासायचे. ती माझ्या अंगावर रेलायची. साऱ्या अंगातून एक वीज संचारत जायची.



या सर्व घटनांची संगती मी प्रेम नावाच्या अदृश्य पदार्थाशी लावतो. कारण बेनच्या बोलण्यातून यालाच प्रेम म्हणतात असं आलं होतं.

—मग आईबापसुद्धा आपल्या अपल्यावर अशाच प्रकारे प्रेम करीत असावेत का? डोळ्यांची चुंबनं – हॉटेलसमधली निळ्या मंद उजेडातील बदबदीत दंडाची दुलई. प्रश्नांची एक भोवळ चक्राकार! दूर दूरपर्यंत जिकड पहावं तिकडं प्रश्नच्या प्रश्न आकड्यासारखे आरमप्रौढी डोके वर काढून विखुरलेले दिसतात आणि दूर-दूरवर कुठंतरी क्षितिजाच्या जवळपास उत्तरांची अदृष्य, काल्पनिक कुंपणे. तिथे गतीमान होत गेलेली चक्राकार प्रश्नांची भोवळ क्षणभरच स्थिरावलेली दिसते. पुन्हा उलट दिशेने गतीमान होत होत येते माझ्यापर्यंत. मग ती थडकते एका देहाला, मनाला! ते मन, तो देह – यशवंत विनायक गुप्ते.

टाईपरायटरवरची बोटे. नेलपेंटने रंगवलेली, निमुळती, बोथट, बोडखी! एखाद्या कुत्र्याच्या तोंडातून लाळ झिरपावी तशी या बोटातून जवळीकीची सवेदना झिरपत जाते. रेग्युलरली. मंथली त्या संवेदना पगारानंतरच्या काही रात्री सिनेमा टॉकीजच्या अधारात रेयॉनच्या कोटातूनही प्रवेश करून साऱ्या अंगाला झोंबायच्या.

असंख्य प्रश्नांच्या भोवळीपासून काही काळ मुक्त असलेला मी पुन्हा त्या वर्तुळात सापडतो. वर्तुळं लांबवर दिसणाऱ्या त्या अदृष्य कुंपणावर थडकून परत येत असतात निरुत्तरीतपणे! वर्तुळात मी गुदमरून जातो.

मी? कोण? प्रेम? मेरी डिसुझा? आई? नरेन बेन? बाप? टाईपरायटर-वरची बोटं?

या सर्वांना शोधता शोधता स्वतःलाच हरवणारा मी यशवंत विनायक गुप्ते. एक प्रश्नचिन्ह!

□ □ □

जमिनीवर उमटू नयेत. पायांना फाटलेले कापड गुंडाळून त्याचा पायमोजासारखा आम्हाला उपयोग होत असायचा.

आमच्या नेहमीच्या धडपडीत आणि उपद्व्यापात एवढे गुंतलो होतो की, वेळ कसा भरभर निघून जात होता याची कल्पना येत नव्हती.

आमच्यापाशी नैतिक बळ होतं. देशसेवेने आम्ही भारलो गेलो होतो. आता आमच्यात हुद्द्याच्या दृष्टीने फरक नव्हता. सगळेजण एकाच पातळीवर होतो. एका रक्ताच्या धाग्याने जोडले गेलो होतो. या जीवघेण्या धडपडीत आम्ही अजूनही जिवंत होतो आणि एकमेकांचे आम्ही अभिनंदन करत होतो. पण पावसाळा सुरू झाला आणि आमच्या उत्साहावर पाणी पडलं

काळेकुट्ट मेघ आकाशात झेपावू लागले. गडगडाट सुरू झाला. आमच्याकडे जे खाण्याचे पदार्थ साठविले गेले होते ते आता संपत आले होते. या हंगामात आम्हाला जी फळे मिळत होती ती कच्चीच असल्यामुळे खाण्याची आबाळ होऊ लागली.

आग पेटविण्याचीही पंचाइत झाली. वाळलेल्या गवतावर खिशातील बॅटरीच्या साहाय्याने आग करता यायची, आता सुक्या गवताची अडचण भासू लागली. दिवस काढणे एवढे त्रासदायक नव्हते पण रात्र म्हणजे प्रत्यक्ष शिक्षा आणि महाभयंकर डोकेदुखी होऊ लागली. तुफान कोसळणारा पाऊस, सगळीकडे किर्र शांतता, आकाशाला फाटणाऱ्या विजा आणि कडाक्याची थंडी यामुळे रक्त गोठल्यासारखे झाले होते. अन्न शिजवायची समस्या उभी राहिली. बसायच्या जागेवर ओलसरपणा पसरला.

थंडीत त्या ओलसरपणापासून संरक्षणाचा मार्ग काढण्यासाठी तातडीने आम्हाला काहीतरी करणे आवश्यक होते. मी मिनाकावाशी चर्चा केली. आमच्या छप्परचा जो पत्रा होता तो कापून त्याचा भिंतीसारखा उपयोग करावा असं मला वाटत होतं. मिनाकावाला माझी कल्पना आवडली नाही. तो म्हणाला, "पत्रा कापण्या-पेक्षा छप्परच थोडं खाली केल्यास पावसाचा तसा त्रास होणार नाही. शिवाय जास्त जागेत निदान व्यवस्थित पाय पसरून झोपायला तर मिळेल." मिनाकावा माझं मत ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. आपण जे बोलतोय तेच खरं असल्याचा हेका त्याने धरला.

"तू पत्रा कापल्यास आपली बसायचीसुद्धा अडचण होईल बघ, तेव्हा तू या भानगडीत पडू नकोस."

"आपण छप्पराचा विचार करतो आहोत ते केवळ पावसासाठीच ना, पावसाची

भुरभूर थांबली की, छप्पर बाजूला करू शकतो आपण. तेव्हा ते काही खाली घ्यायला नको." मियाझावा मध्येच म्हणाला.

"शुद्ध गाढवपणा आहे हा!" मिनाकावा ओरडलाच. "तुम्ही तसं करत असाल तर मला माझी दुसरीकडे सोय पहावी लागेल, तुमच्यापासून वेगळं रहाणंच मला आवडेल."

"म्हणजे तुला आमच्यापासून वेगळं रहायचं आहे तर?" मी खोचकपणे म्हणालो.

"हो, तसाच तर माझा विचार आहे." मिनाकावा म्हणाला. "किनाऱ्यावर जी माणसे आहेत त्यांना मला जाऊन मिळायचे आहे."

नैसर्गिक आपत्तींना तोंड देता देता जीव अगदी मेटाकुटीला आला असताना आमच्यात या संघर्षाने डोकं वर काढणं म्हणजे दुर्दैवाखेरीज दुसरं काय आम्हाला मिळालं होत? पण समझोत्याकडं कुणाचाच कल दिसेना. मिनाकावाचा विचार पक्का झाला. भुरभुरणाऱ्या पावसातून दूर कुठेतरी तो निघून गेला. आपलं सामान बरोबर न्यायला तो विसरला नव्हता.

आलेला प्रत्येक दिवस त्याच गतीने जात होता. आमच्यात या प्रतिकूल परिस्थितीतही फाटाफूट व्हावी याची खंत मनाला लागून राहिली. सगळाच मूर्खपणा होता तो. पण हे सगळं होऊ न देणे तरी माझ्या हाती कुठं होतं? तरी मनातून, तो कुठं जरी असला तरी सुरक्षित रहावा हीच माझी परमेश्वरापाशी प्रार्थना घालली होती. निदान तो एकाकी तरी राहू नये असं मला वाटत होतं.

तरी मियाझावा माझ्याबरोबर होता हाच मला आशेचा किरण होता आता आम्हा दोघात तरी कसल्याच प्रकारची ताणाताणी होऊ नये याची मी खबरदारी घेत होतो. एक महिना पार पडला. आम्हा दोघात कसलीच कुरबर झाली नाही. भूक भागविणे आणि प्रकृतीची आहे त्या परिस्थितीत काळजी घेणे याकडे आम्ही लक्ष केंद्रीत केलं.

जुलै महिन्याची एक सकाळ. आकाश ढगाळलेले होते. हवेत कुंदपणा होता. मी आणि मियाझावा टेकडीच्या खालच्या भागात उतरलो होतो. आमच्या निवाऱ्यापासून आम्ही तसे दूर नव्हतो. आता मिनाकावा जेथे रहायचा त्या भागातून आम्हाला बंदुकीच्या काही फैरी आणि हातबॉबचा आवाज आला. आवाज कानी पडताच तेथून आम्ही धूम ठोकली. काही वेळात तिथं शांतता दिसली. आमच्या सभोवती उंचच उंच झाडे होती. "आपण एखाद्या झाडावर चढून तिकडे दृष्टिक्षेप टाकायचा का?" मियाझावा मला म्हणाला.

आम्ही एका बदामाच्या झाडासारख्या उंच झाडावर चढलो. त्या भागातून एक बराच उंच पांढराशुभ्र धुराचा लोळ आकाशात वर चालला होता.

अमेरिकन गस्त घालणारे पथक जेव्हा अशा निवाऱ्याच्या जागा बघायचे त्या-

त्या जागांचा असाच ते विध्वंस करून टाकायचे. आम्ही घाबरतच आमच्या निवाऱ्याच्या दिशेने पाहिले. तसं काही घडल्याचे दिसत नव्हते.

"आता मिनाकावा सुरक्षित असेल की नाही ते परमेश्वरच जाणे!" मी मनात पुटपुटलो.

"मला त्यात शक्यता कमीच दिसते आहे." मियाझावा काहीतरी हरवल्या-सारखा बोलला. "त्या भयंकर परिस्थितीतून तो सटकणे कसं शक्य आहे?"

धूराचा पट्टा वातावरणात विरळा गेला. सगळीकडे शांतता होती तरी खाली उतरायला आम्ही धजावत नव्हतो. कुत्र्या मांजराची शिकार करताना त्याची जशी हालत होते त्याच परिस्थितीत आम्ही वावरत होतो. थोड्याच वेळात आकाशात ढगांची जमवाजमव झाली आणि पावसाचे आगमन झालं. आम्ही पुरे भिजून गेलो. पाऊस थांबला. सगळीकडे एक तजेलदारपणा पसरला. तरी आमच्या मनावरील दडपण काही कमी झालं नव्हतं. तरी धीर धरून आम्ही खाली उतरलो.

दोन दिवस शांततेत गेले. तिसरा दिवस उजाडला. पावसाची भुरभूर चालूलीच होती. एवढ्यात आम्हाला जवळून आवाज आला.

"इटो! मियाझावा!! बघा मी परत आलोय!!!"

मी मियाझावाकडं बघितलं. आमची दृष्टादृष्ट झाली. आम्ही बाहेर आलो. अंधूक प्रकाशात दोन माणसे आमच्या निवाऱ्यासमोर उभी होती. त्यातील मिनाकावाला ओळखायला आम्हाला वेळ लागला नाही.

मिनाकावा परत आल्याचे पाहून अत्यानंदाने आम्ही त्याला मिठ्या मारल्या. घडलेली सारी हकिगत त्याने आम्हाला सांगितली.

"आमच्यावर हल्ला करणारी ती माणसे कॅमेरो या रानटी जमातीची होती. बंदुका आणि हातबॉबनी त्यांनी तीन बाजूनी आमच्यावर हल्ला चढविला. नशीबाने त्याचवेळी मी बाहेर असल्यामुळे वाचलो."

"माझा मित्र उमिनो पण वाचला, त्यालाही मग मी बरोबर आणलं."

"आणि बाकीचे?" मी अधिरतेने विचारले.

"त्यांच्याबद्दल आता काय बोलाव?" उमिनो बेफिकीर वृत्तीने म्हणाला. त्याच्या त्या उत्तराने तो माझ्या मनातून सरकन् उतरला.

आता हे नवं सकट आमच्यासमोर उभं राहिलं! मनाने धास्ती घेतली की, ही रानटी जमातीची माणसे आमची पाळेमुळे खणून काढल्याखेरीज रहाणार नाहीत. कदाचित ते याच कामावर असले की सगळं संपल्यासारखंच होतं. कारण ते लोक जपानी लोकांचा तिरस्कार करायचे. शिवाय या भागातील त्यांना खडान्-खडा माहिती होतीच. त्यांच्याकडील भयंकर तिखट कुत्री म्हणजे जंगली श्वापदेच होती. माझ्या पोटात भीतीने गोळा उभा राहिला. धीर खचू लागला. अमेरिकन किंवा ऑस्ट्रेलियन शोध पथकाची भिती त्यामानाने आम्हाला कमी भासू लागली.

तरी नशीबावर हवाला ठेवून पूर्ण सावधानता बाळगायला हवी होती आम्हाला. मिनाकावा आणि उमिनो जवळच्याच आसऱ्यापाशी रहात होते. पुष्कळ वेळा ते गप्पा मारण्यासाठी आमच्याकडे येत. कधी कधी आमच्या गप्पा एवढया रंगत की उभी रात्र त्यात कधी निघून जायची याची कल्पनाच येत नसे. आमचे गाव. आमचे नातेवाईक, युद्ध आणि इतर सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्यात आमचा वेळ जाई. अगदी हळू आवाजात आम्ही बोलत असू.

आम्हाला अजूनही आशेचा किरण दिसत होता. त्यावरच आम्हाला जगावसं वाटत होतं. आज ना उद्या जपानची नव्या दमाची कुमक येईल आणि आमचा हा वनवास एकदाचा संपेल. दिवस निघून जात होते. पण मनात त्याच विषयाची आशेची पालवी फुलत होती. तेच आमचे एकमेव स्वप्न होते !

आमच्या नशीबात ही यातायात परमेश्वरानेच मुद्दाम केली असेल. नाहीतर प्रत्यक्ष युद्ध सप्टेंबर १९४५ साली संपूनही युद्ध संपलेले नाही या कल्पनेत आम्हाला का वावरावे लागले असते ! युद्ध समाप्तीचा करार दोन्ही राष्ट्रात होऊन गेला होता.

आमचं दुःख विसरण्यासाठी सतत आम्ही कामात गुंतवून घेत होतो. पण मन कितीही घट्ट केलं तरी त्या झंझावाती परिस्थितीपुढे मनावरील पकड सैलच पडत होती. या पावसाळयाच्या हंगामात आग तयार करायची अडचण आमच्यासमोर उभी राहिली. आग कशी तयार करायची याचं गणित अजूनही जमत नव्हतं. नंतर आम्ही एक कल्पना लढविली. वाया गेलेल्या बंदुकीच्या गोळयातील दारू साठवून ठेवायची आणि विजेची पितळी तार घासून घासून एवढी गरम करायची की त्यावर थोडीशी दारू टाकल्यावर आग तयार व्हावी. हा प्रयोग बराच यशस्वी झाला आणि रात्री जेवण करायचा प्रश्न काही अंशी सोडविला गेला. परिस्थितीवर आम्ही ताबा ठेवला. आमच्या अलौकिक नीतिधैर्यापासूनच आम्हाला हे शक्य झालं आणि अभिमानही वाटला. आमच्या चातुर्यालाच हे सगळे गुण द्यायला हवे होते. एके दिवशी मिनाकावा आणि उमिनोने एक मोठा मासाचा तुकडा आमच्या समोर आणून टाकला.

आम्हाला अतिशय आनंद झाला. मी अर्धा दिवस हातात रायफल घेऊन काळ-वीटाची शिकार करण्यात गुंतलो होतो पण काही फायदा झाला नाही. उमिनोने धडपड करून एक मोठे काळवीट मारून आणले होते.

कदाचित तो महाराजा ताइशोचा वाढदिवस आहे असे आम्हाला आठवत होते. आम्ही तो दिवस उत्सवपूर्वक साजरा करायचे ठरविले. मास तर होतेच. ते रुबदार आणि ताजं मास एवढे चांगले होते की, त्याच्या वासानेच आम्ही एवढे पेटून गेलो की कधी एकदा ते पोटात पडते असे होऊन गेले. त्या वासाच्या धुंदीत आम्ही असताना बाहेर एक मोठा आवाज झाला याची कल्पनाच आम्हाला येऊ शकली

नाही. पण आम्हाला वेळ झाला होता—

हवा कापत जाणारी एक गोळी झाडली गेली. एक रानटी जमातीचा माणूस मी पाहिला. त्याने प्रत्यक्ष गोळी चालविताना मी पाहिले. मियाझावाची आर्त किंकाळी माझ्या कानावर आली. तो धाडकन् जमिनीवर कोसळला होता. गोळीने आपलं काम नेमकं साधलं होतं. हे बघून मी वरच्या बाजूला जीव घेऊन पळालो.

मन घट्ट केलं. खाली उतरलो. मिनाकावा आणि उमिनो अस्ताव्यस्त पडलेल्या मियाझावाच्या देहाकडे पहात निश्चल उभे होते. पक्षी तडफडून खाली कोसळावा तशा अवस्थेत त्याला बघून हृदय कापल्यासारखे झाले. त्या गोष्टीचाच हा प्रताप होता. त्याच्या त्या कळाहीन चेहऱ्याकडे पाहिले मात्र आणि मला रडूच कोसळले. माझ्या शरीरावर कुणीतरी चाकूने वार करताहेत असं मला वाटू लागलं. हाता पायांना कंप सुटला. त्या प्रसंगाने आम्ही हादरून गेलो. प्रचंड खळबळीनं आम्ही हालविलो गेलो. त्या जागी रहाणे आता सुरक्षित नव्हते. आम्ही उठलो. कसलाच विचार मनाशी न करता चालायला लागलो वाट फुटेल तिथं. त्या जागेपासून जास्तच जास्त दूर, कुठेतरी दूर आम्हाला जावसं वाटलं.

दिवस रात्रीत विरघळला आणि आसऱ्यासाठी आम्ही निवाऱ्याकडे येऊन पहातो तर काय, मियाझावाच्या मृत शरीरावर कुणीतरी माती ओढली होती. आमचं छप्पर काढून ते चोळामोळा करून फेकलेले होते.

"त्या मासाच्या वासानेच हा सगळा घोटाळा केला." मी भ्रमिष्टासारखा हेच बोलत बसलो. "त्यांच्या शिकारी कुत्र्यांना वास आला असेल कदाचित्."

"एकाच माणसाचे काम असावे हे." मिनाकावा म्हणाला, "नंतर आपल्या टोळीतील माणसे आणून हे सगळं उरकलं असेल त्याने!"

त्या रात्रीनंतर मी मिनाकावा आणि उमिनोची साथ सोडली नाही. माझ्या एकट्याच्या मनोधैर्यावर मी कधीच जिवंत राहिलो नसतो. आम्ही ती अभागी जागा सोडली. आणि बेटाच्या दक्षिण भागात सरकलो. तलोफोफो नदीच्या किनाऱ्यावर आम्ही निवारा उभा करायचे ठरविले.

१९४७ चा पावसाळा निर्विघ्नपणे पार पडला. तसा विशेष त्रास झाला नाही. पण त्यानंतर सगळ्याच गोष्टी हात धुऊन पाठीशी लागल्या. आम्ही एवढे अशक्त झालो होतो की, अंगात काहीच कसलाच प्रकारचा उत्साह नव्हता. सबंध दिवस आम्ही झोपून विश्रांतीत घालवत होतो. आमच्यातील उमिनो डोक्याने तरबेज होता. आमच्या खाण्यात मीठ नसल्याचा हा परिणाम आहे याची त्याला कल्पना आली. समुद्राचे खारे पाणी आणायची योजना त्याने आखली. रस्ता सरळ असला तरी त्यावर उघडपणे चालण्याचे धैर्य आमच्यात होते कुठे? पण एका रात्री आम्ही समुद्राच्या किनारी पाय विसावलेच. समुद्राचं कितीतरी पाणी यथेच्छ पोटात भरून घेतले. एका मोठ्या भांड्यात पाणी साठविले. सागराच्या फेसाळ-

लेऱ्या लाटा पायाशी येऊन परत असमर्थपणे मागे जात होत्या. आमच्या आशेच्या किरणाची सुद्धा अशीच अवस्था झाली होती. ह्या खाऱ्या पाण्याच्या चवीने माझा उत्साह परत आल्यासारखा मला वाटलं. आम्ही परत मागे फिरलो. अर्ध्या वाटेवर आलो. मला चालवेनासे झाले. गळा कोंडल्यासारखा वाटू लागला. परत तहानेने व्याकूळ झालो. मी वाटेवरच कोसळलो.

शेवटी आमच्या आसऱ्यापाशी आम्ही आलो. तहानेने आम्ही बेजार झालो होतो. आम्ही सगळेजण जमिनीवर खिळून पडलो. ज्यावेळी आम्ही शुद्धीवर आलो तेव्हा आम्ही प्रकृतीला आराम वाटावा म्हणून खोबऱ्याचा रस करून तो समुद्राच्या खारट पाण्यात गरम करून घेण्यास सुरवात केली. पण दुर्दैवाने आमचा अंदाज चुकला. आराम बाजूलाच पण पुढील तब्बल तीन दिवस आम्ही हगवणीने पुरे बेजार होऊन गेलो. काही दिवसांनी हवी असलेली गोष्ट आम्हाला मिळाली. समुद्राचे पाणी बराच वेळ उकळून त्याचे बाष्पीभवन झाल्यावर त्यापासून पांढरे शुभ्र मीठ हाती पडले.

आता आमच्या खायच्या गोष्टीत बरेच बदल झाले. मोटरच्या टायर ट्यूब मधून आम्ही समुद्राचे पाणी आणत असू. पहिले कित्येक दिवस बटाट्यासारख्या चवीची कांद्यासारख्या दिसणाऱ्या कंदमुळावर आमची गुजराण चालू होती. काही शिजवून ठेवलेली कंदमुळें आणि फळें आम्ही डब्यात बंद करून ठेवित होतो. मांस मिठात ठेवले तर ते बरेच दिवस टिकते याचा आम्हाला उलगडा झाला. काही दिवसानंतर नदीतील माशांवर आमची उपजीविका चालू लागली. हे मासे साधारण एक फूट लांबीचे असत. आम्हाला जपानमध्ये असल्याच चवीचे मासे खाण्याची सवय असल्यामुळे आमचं जेवण रुचकर होऊ लागलं.

आम्ही उत्साहाच्या भरात एक जाळं विणलं. पुष्कळ मासे आम्हाला मिळू लागले. शेवटी तर मासे जेवणात एवढे येऊ लागले की, त्याचा घास तोंडाकडे न्यायलाही कंटाळा येऊ लागला. तलोफोफो नदीत एके दिवशी आम्ही एक मासा पकडला. मासा बराच मोठा होता. तो खाल्ल्यावर आम्हा सर्वांच्या पोटात अशा कळा येऊ लागल्या की, वाटलं आता सगळं संपलंच! त्यानंतर त्या माशाच्या वाटेला आम्ही गेलो नाही. तो जाळ्यात मिळाला की रागाने त्याला आम्ही भिरकावून देऊ लागलो.

आमच्यापाशी पुरेसा दारुगोळा असता तर बऱ्याच गोष्टी आम्हाला साधता आल्या असत्या. माझ्याकडे केवळ आठच काडतुसे होती. मी त्यांचा काही उपयोग न करता व्यवस्थित ती जपून ठेवली होती. उमिनोकडे एक पिस्तुल होते. तो ते आपल्या झोपण्याच्या जागेपाशी नेहमी ठेवायचा. मी जेव्हा महत्त्वाच्या गोष्टी बरोबर बाळगीत जा असं म्हटल्यावर माझ्यावर तो खवळला. भडकून तो म्हणाला, " माझ्या कुठल्याच गोष्टीत कुणी चोंबडेपणा केलेला मला आवडणार नाही, शिवाय

कुणी मला सल्ला द्यावा असं मला वाटत नाही. मरायचं असलं तर मारणाऱ्याचा चेंदू बाहेर काढूनच मरेन तरच नावाचा उमिनो "

उमिनो आणि माझ्यात बरेच मतभेद होते, पण प्रत्येक वेळी मी त्याला सांभाळून घेत होतो.

दिवसामागून दिवस जात होते. वेळ समजण्यासाठी आमचं चंद्राकडे लक्ष असायचं. माझ्याकडे एक डायरी होती. अमेरिकनांनी टाकलेल्या कचऱ्यात ती मला सापडली होती. सोबत एक छोटी पेन्सीलही होती. मला येत असलेले सर्व अनुभव मी तीत नोंदवित होतो. (१९५० मध्ये कोरियात युद्ध चालू होतं आणि मी त्यावेळी माझ्या आठवणी लिहित होतो.)

मी जे जें काय लिही ते काही दिवसांनी वाचन पहायची मला इच्छा होई. कित्येक वर्षांचा कालावधी असाच निघून गेला होता. आणखी किती वर्षं या स्थितीत जातील हा विचार मनात आल्यानंतर मन उत्साह गळून पडायला लागायचा ही खंत सारखी मनाला बोचत राही. सगळं जीवन कसं डोळ्यासमोर मातीमोल झाल्याचं दिसत होतं कधी कधी वाटायचं जपाननं सर्व सामर्थ्यानिशी या बेटावर हल्ला केलाही असेल पण पराभव पदरी पडल्यावर परत प्रयत्नांवर पाणी सोडले असेल. मग आणखीनच वेदनो जाणवायची.

हे खर असाव अस एकदा आम्हाला वाटू लागलं. मी आणि मिनाकावा बाहेर भटकत असताना अमेरिकन छावणीच्या अगदी नजीक येऊन थडकलो. आमच्याकडे कुणाचं लक्ष जावू नये यासाठी आम्ही खबरदारी घेतली होती. त्यांच्या छोट्या छोट्या इमारती प्रकाशात न्हावून निघत होत्या. सगळेजण खुशीत दिसत होते. प्रत्येकजण सुंदर सुंदर तरुणींना घेऊन नाचात गुंतले होते. जाझ संगीताने वातावरणात एक वेगळी धुंदी येत होती. हे सगळं पाहून आणखी काय वाटायचं राहिलं होतं ! सगळं विचारापलिकडचं होतं. आम्ही गुपचुप मागे फिरलो.

१९५१ साल ! युद्ध संपून तब्बल सात वर्षे झाली होती. त्यावर्षी बाहेरच्या जगाचा थोडासा कानोसा लागला. जपान त्यावेळी सार्वभौम झाल होतं.

अशाच एका संध्याकाळी आम्ही बाहेर पडलो होतो. आमची खाण्यासाठी धडपड चालली होती. मला वाटेत पडलेली एक पेटी दिसली. ती छोटीशीच होती आणि कागदात ती व्यवस्थित बांधली होती.

"इथे त्याला हात लावू नकोस, कदाचित आमच्यासाठी तो सापळा असेल" मिनाकावाने मला बजावले.

तरी धीर धरून मी ती वस्तु हातात घेतलीच. अधाशासारखी उघडून पाहिली त्यात बऱ्याच पेन्सीलस होत्या त्या जपानी बनावटीच्या होत्या. त्या नव्या होत्या आणि त्याचा ओळखीचा वास नाकात शिरल्यावर मला बर वाटलं. त्या सोबत बरेच कोरे कागद होते. त्यात मला एक पत्र मिळाले. त्या पत्राचं शिर्षक होतं,

"लष्करातील आणि नाविक दलातील निर्वासीत बनलेल्या जपानी सैनिकांनो," जिज्ञासा ताणली गेली. कुतूहलाने मी पत्र वाचायला सुरवात केली "देशासाठी जीवन वेचलेल्या जपानी सैनिकांनो तुमच्या निस्सीम त्यागानं आणि अलौकिक प्रयत्नातून जपानचं नव्या युगाचं स्वप्न साकार झालं आहे. हे राष्ट्र तुमचे सदैव ऋणी राहील. आम्हाला खरोखरच अभिमान आणि आनंद वाटतो आहे की, परिस्थितीला तोंड देऊन तुम्ही मोठ्या आशावादावर परत मातृभूमीला येण्याला आतूर आहात. या तुमच्या त्यागात तुम्हाला मदत करणं आमचं प्रमुख कर्तव्य आहे. तुमच्या मातृभूमीला तुमचे पाय लागावे यासाठी आमची धडपड आहे. तुम्हाला त्याची सत्यता पटवायला एक प्रसंग सांगायला हरकत नाही. असेच सात सैनिक कुठं तरी भटकत चालले असताना त्यांनी अमेरिकन सैनिकांची मदत घेतली आणि आता ते मायदेशी सुखरूप परतले आहेत. कदाचित तुमचा यावर विश्वास बसणार नाही. सोबतच्या कोऱ्या कागदावर तुमच्या नातेवाईकांना जे लिहावंसं वाटतं ते लिहा."

मी पत्र वाचलं आणि फाडून फेकून दिले

त्या पत्रानं आमचं सारं मनोधैर्य परत धुळीला मिळविलं. निरनिराळ्या युद्ध आघाड्यांवर शत्रू अशाच युक्त्या योजत असल्याचे आम्हाला माहित होतं. आम्हा विघांच्या घाणेरीश जगात आम्हाला आता कुणं जवळचं भेटणार नव्हतं. मन बधीर झालं. पुढे काय होणार याची आम्हाला चाहूल लागली होती. आता आमची कसलीच इच्छा राहिली नाही, स्वतःच्या डोळ्यांसमोर स्वतःच उध्वस्त झालेलं जीवन आम्ही अनुभवित होतो. त्यानंतर आमची मते कुठल्याच गोष्टीवर जुळली नाहीत. प्रत्येकाने स्वतंत्र रहायचं ठरविलं. खऱ्या अर्थाने उमिनो पासून मी दूर झालो प्रत्येक वेळी मलाच तो दोषी ठरवी. माझ्यापासून त्याला त्रास होत असल्याचे नेहमी तो बोलून दाखवी. मी जास्त खातो म्हणून तो मला तंबी द्यायचा पण प्रत्यक्षात तो आळशी होता. सबंध दिवस रानावनात भटकून मी हव्या असलेल्या गोष्टी गोळा करायला गुंतलेली असे.

एका रात्री मी आग पेटवत असता कारण नसताना तो माझ्यावर खेकसला. "इतो आग पेटवताना एवढा धूर का करतोस, तुझं टाळकं ठिकाणावर आहे ना? तुझ्यापासून सगळ्याच गोष्टींचा विचका उडत चाललेला आहे."

"माझ्यापेक्षा तुझी प्रगती खात्रीने जास्त नसेल. तुला कुठल्याच गोष्टीसाठी हातपाय हालवावे लागत नाहीत म्हणून ह्या गोष्टी तुला बोलाव्याशा वाटतात दुसरं काय, हातपाय हालव आणि मगच तुझं घाणेरडं तोंड उघड."

"काय शहाणपणाचा आव आणतो आहे पण माझ्या सहृदयतेनेच तुला इथे रहायला मिळालं नाही तर काय अवस्था झाली असती माहित आहे." तो म्हणाला, "उपकाराची फेड छान करतो आहेस पण, याहून जास्त मेहनत घेऊन काम कर.

तुझ्यावर आम्ही एवढे उपकार केले आहेत की सुखासुखी त्याची परतफेड होणार नाही."

तो रागाने खवळला होता. मला त्याने मन मानेल तशा शिव्या दिल्या. आणि एका फालतू शेतकऱ्याचा बावळट पोरगा म्हणून माझी संभावना केली. नंतर तो आपल्या आसपास गेला. काही वेळाने परत आला. त्याच्या हातात भरलेलं पिस्तुल होत. माझ्यावर ते त्याने रोखून धरलं.

मला राग आला. माझा ताबा सुटला. मी त्याचा हात घट्ट पकडला आणि त्याच्या पायावर लाथ मारली तसा तो खाली कोसळला. मला त्याने पायाला पकडून खाली खेचले. त्याच्या हातातील पिस्तुल मी भिरकावून दिले. आमची चांगलीच गुद्दागुद्दी चालू झाली. दोघांनी एकमेकांना झोडपून काढले. एवढ्यात मिनाकावा मध्ये पडला. आम्हा दोघांना त्याने बाजुला केले. त्याच्या दोन्ही बाजूला उभे राहून चाजलेल्या बैलासारखे आम्ही एकमेकांकडे पहात होतो.

काही वेळ निघून गेला आणि झालेल्या गोष्टीची मला खंत वाटू लागली. मी त्याची मनापासून क्षमा मागितली पण त्याचा स्विकार त्याने केला नाही. रागाने तो निघूनही गेला.

उमिनो निघून गेल्यावर मी आणि मिनाकावाने कुणी कुणी काय काय करायचे हे ठरवून टाकले. आपण गोळा केलेल्या गोष्टी प्रत्येकाने खाव्या. काही ठराविक गोष्टीत म्हणजे मासे किंवा मांस मिळाल्यास ते मात्र विभागून घ्यावे असे ठरले. मिनाकावा बरोबर माझे जीवन सुरळीत चालू लागले. दिवस जात होते....

पूर्वार्ध समाप्त

## पुस्तके

**सु. म. घाटे**

# फडके शैलीत सांगितलेली शास्त्रीजीवनावरील कॉमेंटरी

'अमृतपत्र' ही कादंबरी भा. द. खेरांनी एकटयानेच लिहिली आहे. त्यासाठी त्यांनी खूप प्रवास, प्रत्यक्ष भेटी व बरेच योजनाबद्ध वाचन केले आहे; याची साक्ष प्रस्तावना व शेवटीं जोडलेल्या सूचीवरून कळून येते. ते कादंबरीतूनही तसे समजते. पण फक्त उल्लेखानेच ! त्याचा कादंबरीच्या गुणवत्तेसाठी कितीसा उपयोग झाला आहे हा प्रश्नच आहे.

ह्या कादंबरीचे—यशवंतराव म्हणतात त्याप्रमाणें-तीन भाग पडतात. पहिला भाग शास्त्री-नेहरू. नेहरूकुटुंबात शास्त्रीजी फार लहानपणी आले व नेहरूंच्या अंतापर्यंत त्यांच्या कुटुंबाचा एक घटक म्हणून वावरले. अर्थात विचारांच्या सावलीत वाढले तरीही त्यांची अशी काही खास वैशिष्टये होतीच. कल्पकतेचा आश्रय घेण्यास जेथे जेथे म्हणून जागा होती तेथे तेथे खेरांनी तो भरपूर घेतला आहे व तो 'खरा वाटावा' इतका छान रंगविला आहे. चरित्र—कादंबरीत जे कल्पित यावे लागते ते कसे असावे याची छान जाणीव सर्व कादंबरीभर आढळते. खेरांचा हा निश्चितच क्रेडिट—पॉइंट आहे.

दुसरा भाग शास्त्रीजींची कारकीर्द—अर्थातच युद्ध ! पाकिस्तान बरोबरचे युद्ध. त्यात शास्त्रींनी घेतलेले निर्णय, त्यांची कडक अंमलबजावणी, उत्तम प्रशासन, सार्थ आत्मविश्वास इ. सर्वच गुणाचे दर्शन जगाला घडले. हा भाग वर्णन करताना मात्र थोडे विषयांतर झाल्यासारखे वाटते. भारत-पाक युद्धावर सर्वत्र शास्त्रीजींची छाप होती हे खरेच. पण त्यासाठी ३०।३२ पाने प्रत्यक्ष सरहद्दीवरचे चित्रण करण्याची आवश्यकता नव्हती. ही कादंबरी आहे तरी कोणावर असा प्रश्न हीं वर्णने वाचताना पडतो. युद्धभूमीवरचे हे सर्व वर्णन इतक्या बारकाईनं शास्त्रीजींच्या डोळयासमोरून फ्लॅश-बॅकसारखे गेले. येथे शास्त्री चरित्र वर्णनाचे भान गेल्यासारखे झाले आहे. 'अमृतपुत्र' मधून हा एवढा भाग अलगद काढून टाकला तरी चालेल.

या कादंबरीतील तिसरा भाग म्हणजे ताश्कंदमधील वाटाघाटी व त्यांचा मृत्यू. हा भाग खेरांनी खूप मेहनत घेऊन रंगवला आहे. ते स्वतः तो सर्व परिसर पाहून

आल्यामुळे तर चित्रणाच्या यथार्थतेत भरच पडली आहे. 'दचा' हे ताश्कंद मधले एक घर जेथे शास्त्री राहिले व जेथे त्यांचा मृत्यू घडून आला. तो 'दचा,' त्याचे अंर्बाह्य वर्णन, गूढत्व इत्यादींचे रोचक वर्णन केले आहे. मला तर हरिभाऊंच्या 'वज्रघात' मधल्या 'कुंजवनाशी' त्याची तुलना करावीशी वाटते. कुंजवनही असेच गूढ, रम्य, निसर्गसुंदर व अत्यंत महत्त्वाच्या घटनांचे कादंबरीतले केंद्र आहे

(शास्त्रींच्या गूढ मृत्यूसंबंधी येथे काही 'हिंट' मिळेल वगैरे जिज्ञासा या कादंबरीने पूर्ण होणारच नाही. कारण उघड आहे. तो विषय चरित्राचा आहे चरित्रात्मक कादंबरीचा नाही. खेरांनी या कादंबरीत तरी शास्त्रीजींचा मृत्यू हृदयविकाराच्या तिसऱ्या झटक्याने झाला व पोटावरील फुलीच्या ज्या खुणा होत्या त्या नंतर–प्रेत तसेच राहावे म्हणून–दिलेल्या इंजेक्शनच्या होत्या; असे मानलेले दिसते.)

ही कादंबरी शास्त्रींवरील आहे हे फक्त दुसऱ्या व तिसऱ्या भागातच कळते. कारण पहिल्या भागात शास्त्रीजी नेहरू कुटुंबातच होते. त्यांची मते व त्यांचे व्यक्तित्व तेथे तयार होत होते. नेहरू हे त्यांचे दैवत होते. नेहरूंच्याच मागे व त्यांच्याच छायेखाली त्यांचे सर्व आयुष्य गेले. तरीही कादंबरीतील चित्रण करताना थोडया वेगळया पद्धतीने केले असते तर? नेहरू कुटुंबाच्या गोतावळयाचे वर्णन करताना फक्त त्या गर्दीत कुठेतरी शास्त्रीजी दिसतात असा प्रकार झाला आहे. तसे खरे म्हणजे पूर्णपणे शास्त्री या पहिल्या भागात आले नसते. पण त्यासाठी खेरांनी शक्कल काढली आहे. फक्त जी काही खास फडके–शैलीतील युक्ती त्यांनी काढली आहे त्याचा परिणाम मात्र त्यांना साधता आलेला नाही.

या कादंबरीत फडके–शैलीचा प्रत्यय येतो म्हणजे काय? (एकतर खेर स्वतःला ना. सी. फडक्यांचे शिष्य म्हणवतात. व स्वतः फडकेही स्वतःला त्यांचे गुरू समजत असावेत. आता निश्चित आठवत नाही पण प्रा. फडक्यांनी खेरांचे खूप कौतुक केल्याचे वाचले होते. फडक्यांच्या बाबतीत हा 'अहो रूपम् अहो ध्वनिम्' प्रकार नेहमीच होतो म्हणा.) फडक्यांसारखी व्यक्ति वर्णने, त्यांच्यासारखीच चेहरे वर्णन करण्याची पद्धत. प्रसंग वर्णन केल्यानंतर अकलात्मक अशी गैरलागू तात्पर्ये देण्याची खोड व त्यालाच कादंबरीचो थोरवी समजण्याचा प्रकार–काळाची ओढाताण–आदी सर्व फडक्यांसारखेच.

उदाहरणार्थ पुढील परिच्छेद पहा तो खेरांचा आहे असे मुद्दाम सांगावे लागेल. 'पंडितजींचं हे बोलणं ऐकून चीनचा तो देखणा (?) महामंत्री मनापासून हसला. चायना सिल्कच्या कोटाच्या डाव्या बाहीवरून त्यानं आपला उजवा हात फिरवला. मग खानदानी रुबाबात त्यानं आपलं मस्तक पंडितजींच्या कानाजवळ झुकवलं आणि जणू त्यांच्या कानात बोलल्याप्रमाणे म्हणाला, "ही तुमच्या बाहेर थोडीच आहे?" (पृ. १३२).

व्यक्तीच्या बाह्य हालचालीचे व पेहेराव, चेहरा यांचे वर्णन करायचे आणि शेवटी त्याला फक्त एखादा शब्द अगर प्रश्न जोडायचा आणि 'उत्कृष्ट शैली' ची शेखी मिरवायची हा खास फडके प्रकार आहे. वि. वा. पत्की व सौ. कमलाबाई फडके यांच्याप्रमाणेच खेरेही अशा प्रकारच्या शैलीत फडक्यांचा 'हात धरतात'.

या कादंबरीच्या लेखनात वर्तमान व भूतकाळ यांचो विचित्र सरमिसळ आढळते. म्हणजे असे की एखादी घटना घडत असते. शास्त्रीजी उपस्थित असतात व अचानक त्यांच्या मनात फ्लॅश बॅक सुरू होतो. व आधी घडलेल्या घटना आठवू लागतात. 'मनाची घडणच तशी असते,' हे खरेच पण तरीही वर्तमान व भूत यांचे हे असे व इतके नमुने येथे आढळतात की त्या फॉर्मचा कंटाळा येतो.

ह्याही प्रकारावर फडक्यांचाच प्रभाव आहे. 'अखेरचं बंड' ह्या एकाच कादंबरीत मी काय म्हणतो त्याचा प्रत्यय येईल क्वचित् प्रसंगी असे Flashes उपयोगी पडतातही. पण कादंबरीत जी एक एकसंधता यावी लागते ती त्यामुळे राहत नाही. वाचकाची काळाबरोबरच फार ओढाताण होण्याचा संभव आहे.

वर्णनात पुढील काही घटनांचा सूचक उल्लेख ही कादंबरीकाराच्या प्रतिभेची झेप असते. पण चरित्रात्मक कादंबरीत ती स्वागतार्ह ठरण्याचा तसा संभव नाही. कारण चरित्रे आधीच सर्वश्रुत असतात. निव्वळ काल्पनिक कथांमध्ये हे चालू शकते; शोभून दिसते. उदा. 'हा चिमुकला हात भावी महामंत्र्यांचा आहे, ही गोष्ट फक्त नियतीलाच समजली असेल.'

—आनंद काय किंवा दुःख काय, झोपेला सारं सारखंच असतं.

—काळाची पावलं कुणालाच दिसत नाहीत.

—आपल्याही बाबतीत नियती एक दिवस असाच सूड उगवणार आहे या गोष्टीची शास्त्रीजींना त्या क्षणी सुतराम् कल्पना नव्हती.

असे कित्येक उल्लेख कादंबरीतून सहज काढून दाखविता येण्यासारखे आहेत. प्रसंगांच्या शेवटी जोडलेले हे पंचेस अत्यंत अकलात्मक वाटतात. (अर्थात हाही वारसा फडक्यांचाच आहे.)

या कादंबरीला दोन प्रस्तावना आहेत. एक यशवंतराव चव्हाणांची व दुसरी स्वतः लेखकाची. चव्हाणांनी इर्व्हिंग स्टोनच्या 'ॲगनी अँड एक्स्टसी'चा उल्लेख केला आहे व खेरांनी स्वतः सॉमरसेट मॉमची साक्ष काढली आहे. हार्डीसारखे व्यक्तिवर्णन खेरांना साधले आहे असा यशवंतरावांचा दावा आहे. ह्या विषयी काही न बोलणंच इष्ट नाही काय ?

सॉमरसेट मॉमच्या कादंबऱ्यात ज्याप्रमाणे कोणी एक निवेदक 'मी' असतो—स्वतः मॉमही—तसाच 'अमृतपुत्र' या कादंबरीतला 'मी' हा निवेदक आहे असे लेखक महोदयांचे म्हणणे आहे.

मॉमच्या कादंबऱ्यातला मी हा केवळ निवेदक नसतो. निवेदना पलीकडे काही महत्त्वाचे कार्य तो करतो. त्याचे व्यक्तित्व सपन्न असते. तो घटनांचे स्वतःच्या खास बुद्धिमत्तेनुसार चिंतन करतो, त्यांचे Interpretation करतो. ह्यामुळे कादंबरीतली ती एक व्यक्ती होते. त्याकरिता एकच उदाहरण पुरे आहे – 'मून अँड दि सिक्स पेन्स !'

या (अमृतपुत्र) कादंबरीतला निवेदक फक्त निवेदनाचे कार्य करतो. त्याचे कार्य फक्त उपस्थित राहणे व घटना नोंदविणे एवढेच असते. शास्त्रींबरोबर असलेल्या गोतावळ्यातला एखादा ए. डी. सी. वाटतो; किंवा कार्यकुशल वार्ताहर वाटतो. वरे तो घडलेल्या घटनांवर वर सांगितल्याप्रमाणे अशी गैरलागू कॉमेंटरी करतो की धड अलिप्तपणाही तो साधू शकत नाही. हा 'मी' उपस्थित राहण्यापलीकडे फारसे काही करत नाही. उगाच मॉमच्या साक्षी काढण्यात काय अर्थ आहे ?

कल्पिताचा आश्रय चरित्रात्मक कादंबरीकाराने घ्यायलाच हवा. तसा खेरांनी ता घेतला आहे व सत्य आणि कल्पित यांची एक छान जाण सर्व कादंबरीत दिसते आहे. पण तरीही या कादंबरीत निव्वळ चरित्रदर्शनच होते. चरित्र, घटना, व्यक्ती यांच्या पलीकडे जाऊन जीवनाचा अर्थ, त्यातले वैय्यर्थ, मानवी हतबलता यांचे कलापातळीवर दर्शन होत नाही. कुठेही ही पातळी निवेदनाची सामान्य पातळी सोडून वरच्या निर्माणक्षम, प्रगल्भ पातळीवर पोहोचू शकत नाही. शास्त्री जीवनावरची ही एक कॉमेंटरी वाटते. व एखादा (विजय मर्चंटसारखा) कॉमेंटेटर जसा निवेदनात पूर्वीची एखादी घटना स्मरणातून काढून 'पेश' करतो तसे वर्तमान व भूतकाळाचे एकत्रीकरण येथे झाले आहे. मात्र ही कॉमेंटरी वाचनीय व कित्येक ठिकाणी 'बडी जायकेदार' झाली आहे.

अमृतपुत्र : ले. भा. द. खेर. केसरी प्रकाशन, पुणे. मूल्य १५।– पृ. ४१४



एक गलथान संयोजन

# अखिल भारतीय कबड्डी सामने : भिलाई (मध्यप्रदेश)

—साहेब या देशात दीडशे वर्षे राहिला, त्याचे गुणदोष आवडी निवडीही काही प्रमाणात येथे रुजल्या. येथील वातावरणाशी विसंगत आणि या देशाला न परवडणारा क्रिकेट स्वतःचाच खेळ वाटावा इतक्या प्रेमाने येथे जोपासला गेला.

महाराष्ट्राबाहेरही कबड्डीचे थोडया प्रमाणात असेच झाले. ऐतिहासिक दाखले देता येतील इतका हा खेळ येथे जुना, धुसमुसळा, रगीचा, शक्ती आणि युक्तिचा खिलाफ साधणारा ही येथली स्वभाववैशिष्टये या खेळातही आलेली. ज्या ज्या प्रांतात महाराष्ट्रीयन मोठया प्रमाणावर गेले तेवढयाच प्रांतात कबड्डी खऱ्या अर्थाने वाढला. बंगलोर, बडोदा, इंदूर येथील अनेक संघातले बहुतेक खेळाडू महाराष्ट्रीयन असतात. एवढेच काय पण अखिल भारतीय सामन्यात येणाऱ्या, म्हैसूर, गुजरात, मध्यप्रदेश राज्यांच्या संघातही निम्म्याहून अधिक महाराष्ट्रीयन नावेच आढळतात. अखिल भारतीय कबड्डीचे सामने मध्यप्रदेशात तीन ठिकाणी होतात. इंदुरला महानगरपालिकेतर्फे उज्जयनीला खाजगी क्रीडामंडळाकडून आणि भिलाई येथे पोलाद कारखान्याच्या क्रीडाविभागाकडून, नागपूर विदर्भाहून भिलाईला आलेले महाराष्ट्रीयन या कामात सर्वस्वी पुढाकार घेतात. भिलईच्या सामन्यात यंदा भाग घेण्याचे आकर्षण दोन प्रकारचे होते. एक पोलाद कारखाना बघण्याचे आणि दुसरे अर्थातच सामन्याचे.

कोठेही उशीर न होता दोन दिवसाचा प्रवास संपवून आम्ही दुर्ग स्टेशनवर नेमके रात्री साडेनऊ वाजता पोहचलो. सबंध सामन्यात नेमकेपणे ज्या थोडया गोष्टी घडल्या त्यातही एक गोष्ट. बाकीच्या अनेक महत्त्वाच्या बाबतीत सगळा 'आनंदच' होता.

सामना समितीची कसूर नाही पण कमनशीब मात्र खरे. नुकताच दिल्लीचा अखिल भारतीय आंतरराज्यीय कबड्डी क्रीडामहोत्सव संपला होता. फेब्रुवारीचा

शेवटचा आठवडा असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासाची घरघर लागली होती. या सगळ्या अडचणींमुळे निमंत्रित सोळांपैकी पुरुषांचे अवघे सहा संघ उपस्थित राहिले आणि महिलांनी तर त्याच्यावर ताण केली. आठपैकी अवघा एक संघ आलेला !

निवडणुकीत असो वा सामन्यात असो अनपेक्षित अडचणी उभ्या राहिल्या की माणूस बहुधा गोंधळून जातो पहिलाच अंदाज साफ चुकल्याने सामन्य चे संयोजक जे गोंधळले त्यातून स्वतःच निर्माण केलेल्या चूका त्यांना शेवटपर्यंत निस्तरता आल्या नाहीत.

सर्व ठिकाणाप्रमाणेच संघाची विभागणी चार गटात केली होती. सामने होते अवघे तीन दिवस. त्यापैकीही पहिल्या दिवसाच्या संध्याकाळी सामन्याला सुरवात झाली आणि सुरुवातीला संघ हजर होते अवघे सात. अर्थातच तीन गटात अवघा एकेक सामना घेऊन त्याच दिवशी गट विजेते पदाचे निकाल लागले. चौथ्या गटात तर काय नसते लडडू ठोकूनच अजिंक्यपद ! कारण अवघा एकच संघ ना.

दुसरे दिवशी सकाळी सुभाषमंडळाचा संघ दाखल झाला. स्वतः सामने भरवत असूनही आचारसंहिता गुंडाळून भिलई पोलाद कारखान्याने स्वतःचा संघच सामन्यात दाखल केला. शिवाय भिलईने आणखी दोन फालतू संघाना संधी दिली आणि मग सगळ्यांच्या 'वरताण' अक्कल लढवून चार विभागाचे दोन विभाग केले. आता सामन्याचा मामला कसा घसघशीत झाला. खेळाडूंना एका दिवशी चार अथवा पाच सामने खेळावयास लागतात याची फारशी फिकीर त्यांनी बाळगली नाही.

पहिल्या विभागात होते वंदेमातरम पुणे, सुभाषमंडळ नागपूर, वीर मंडळ रायपूर, भिलई पोलाद कारखाना आणि भिलईचा शिवाजी मंडळ. या विभागातले दोनच सामने गाजले. नागपूरकरांनी पुण्याबरोबर खेळताना प्रथम तीन गुणांची आघाडी मिळवली. निदानरेषा बंद करून पुण्याने ही पिछाडी तोडली आणि आणखी दोन गुण मिळवले. अगदी शेवटच्या चढाईत सुरेश कोंढाळकरने रीठेला विनाकारणच धरण्याची घाई केली आणि सामना समान गुणावर आला. भिलईच्या पोलाद कारखाना संघाने पुण्याचा सरळ सरळ पराभव केला. तर नागपूर आणि भिलई सामना ठरवून खेळण्यात आला आणि गुणशून्य बरोबरी करण्यात आली. ( मुंबईकरांच्या इतर अनुकरणाबरोबर हे 'नसते गुण' ही लांबवर पसरू लागले हे काही चांगले लक्षण नव्हे.) ह्या वनावाने भिलई आणि नागपूर संघ विभागात विजयी ठरले आणि पुणेकर विभागातच गळले. सर्व संघाच्या मर्यादा या सामन्यात उघड्या झाल्या. सुभाष मंडळाची मदार यंदा दिल्लीचे सामने गाजविणाऱ्या रीठे या खेळाडूवर सर्वस्वी होती. गुणही त्यानेच मिळवून द्यावयाचे आणि चौफेर क्षेत्र रक्षण करून ते सांभाळावयाचेही त्यानेच. बाकी एखा खेळाडूला धड निदान रेषा ओलांडता आली तर नशीब. एकटा बाप कमवणारा आणि सारे चिरंजिव उधळणारे

निघाले की जसा संसार व्हावा अगदी तसे या संघाचे सामने व्हायचे. वंदेमातरम संघ हा बाळ कोंडाळकर शिवाय आलेला आम्याबाचून कुडी तसा हा प्रकार. सामने जिंकण्याचे अमोघ अस्त्र बाळासाहेब. त्यांच्या अनुपस्थितीत केवळ बचाव करणे आणि गरज पडल्यास काही गुण निशान रेषा बंद करून मिळवणे या पलिकडे ते काय करणार? त्यातही पकडण्यासाठी विनाकारण केलेली घाई या संघाला नेहमीच नडली. भिलईचा संघ तसा ठाकठीक. पण वेगवान हल्ल्या चढाईपुढे त्यांचे क्षेत्ररक्षण गोंधळे.

दुसऱ्या विभागात रूरकेला, दिल्ली, भोपाळ, सातारा, छत्तीसगड आणि भिलाई या संघाचा समावेश होता. महिन्यापूर्वीच मराठा लान्सरच्या सामन्यात उप अजिंक्यपद मिळवणाऱ्या भोपाळला विभागात सातारा आणि रूरकेला संघाकडून पराभव

---

चार राज्याचे खेळाडू जमले की गप्पा हमखास रंगतात. सामन्यांच्या आणि खेळाच्या. यावेळी मात्र निवडणुकीचा विषय सर्वांच्या ओठात पहिल्यांदा घोळत होता. दिल्लीतील सामान्य आणि गरीब जनतेचा पाठिंबा इंदिराजींना असल्याचे दिल्लीकर सांगत. उत्कल काँग्रेस विधानसभेच्या निवडणुकीत प्रभाव पाडू शकेल पण लोकसभेत इंडिकेटच येणार असे ओरिसावाले म्हणत. मध्य प्रदेशात लढत चुरशीची पण तरीही अधिक जागा सत्तारूढ काँग्रेसलाच मिळतील हा त्या भागातील खेळाडूंचा अंदाज. प्रत्यक्ष भिलईत संघटना आणि सत्तारूढ काँग्रेसमध्ये सरळ सामना होता आणि तो चुरशीचा आहे असे सांगण्यात आले तरी प्रचाराच्या बाबतीत मात्र सारे कसे शांत शांत होते.

— रूरकेला आणि भिलाई या दोन्ही संघातील जे जे चांगले खेळाडू दिसले उदा. सुभाष मंडळाचा रीठे साताऱ्याचा विजय जाधव त्यांना भरपूर पगारावर नोकरीला येण्यासाठी मागणी घातली. रीठेने तो कबूलही केली. (म्हणजे सुभाष मंडळाची चांगलीच पंचाईत. कारण सामन्याच्या आधी चारच दिवस त्यांनी आपल्या संघात त्याला रजिस्टर करून घेतला होता.)

— भिलईला जाऊन पोलाद कारखाना न बघणे म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वराचे दर्शन चुकविणे. सामना संपल्यानंतर दुसरे दिवशी कारखाना दाखविण्याचा प्रयत्न (आश्वासन नव्हे) करतो असे संयोजकांनी सांगितले. अर्थातच अवघे दोन संघ दिल्ली आणि सातारकर थांबू शकले. तीन तास भारताचे हे नवीन तीर्थक्षेत्र डोळे भरून पाहिल्यावर या केलेल्या सोईबद्दल आम्ही तरी सामना समितीला त्यांचे बाकीचे सगळे गुन्हे माफ केले.

---

पसरावे लागले. विनाकारण गरम घेवून खेळण्याची सवय त्यांना नडली. दिल्लीच्या उंच्यापुऱ्या तगड्या खेळाडूंना खेळण्याचे तंत्र हा प्रकार त्यांच्या गावी नव्हताच. त्यामुळे त्यांच्या खेळाने प्रेक्षक खूष झाले तरी समोरच्या संघाला मात्र दुखापतीच्या भितीने जपूनच खेळ वे लागे. यां उलट रूरकेला संघाने अल्पावधीतच चांगली प्रगति दाख-विली. या विभागाचे अजिंक्यपद मिळवलेला साताऱ्च्या श्री. शिवाजी उदय मंडळाचा संघ सर्वच दृष्टीने श्रेष्ठ होता. चौफेर चढाया करणारे पाच चढाईबहाद्दर केवळ या एकाच संघात होते. सर्वात तरुण खेळाडूंचा संघही हाच. या विभागातले उपविजेतेपद मिळाले रूरकेला स्टील प्लेटच्या संघाला.

विभागाची मोडतोड करून केलेल्या नवीन विभागाचे सामने संपल्यावर आणखी दोन गमती घडल्या. सर्व विभागीय सामने संपल्यावर उज्जयनी आणि वेन्याचे संघ उशिरे दाखल झाले. गोंधळलेल्या सामना समितीने त्यांना एक सामना खेळावयास दिला. सामन्याचा तो शेवटचा दिवस. विभागिय आणि बाद पद्धतीचे मिळून नऊ सामने त्या संघाला (जर जिंकत गेले नसते तर) खेळावयास लागले असते. हा मूर्खपणा सुदैवाने संयोजकांच्या लगेच लक्षात आला आणि त्यांनी चूक सुधारली एका विभागातून दोन संघ वर घेण्याची प्रथा मोडून चार संघ वर घेण्याची एक नवीन प्रथा सामना समितिने नियमाच्या विरुद्ध आहे हे माहित असतानाही ऐन-वेळी जाहीर केली. बाद पद्धतीच्या सामन्याच्या जोड्या लावताना चिठ्ठ्या उच-लण्याचा नियम मोडून इच्छेप्रमाणे जोड्या लावल्या गेल्या. बिचाऱ्या असहाय खेळा-डूंनी या साऱ्यापुढे निमुटपणे मान तुकविली. मध्यप्रदेशाच्या कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष आणि अ. भा. कबड्डी संघटनेचे मान्यवर सदस्य आणि या सामन्याचे निरी-क्षक यांच्या उपस्थितीत हा गोंधळ व्हावा यापेक्षा दुर्दैव ते काय ?

बादपद्धतीचे जवळ जवळ सर्वच सामने गाजले. वंदेमातरम संघाबरोबर खेळताना हातातून गेलेले चार गुण पुन्हा मिळवून साताऱ्च्या शिवाजी उदय मंडळाने सामना समान गुणावर आणला आणि जादा वेळेत सामना जिंकला देखील अजून मिसरूड न फुटलेल्या साताऱ्च्या विजय जाधवने ज्या बेदरकारपणे चढाया करून गडी बाद केले आणि ज्या धाडसाने गडी धरले तो खेळ डोळ्याचे पारणे फेडणारा होता. सांगलीच्या राज्य क्रीडामहोत्सवापासून गेल्या दोन महिन्यात चार मोठ्या स्पर्धेत मी या खेळाडूंचा खेळ बघत आहे. आणखी वर्षा दोन वर्षात 'मधू पाटीलची' कीर्ती त्याला मिळाली नाही तरच मला आश्चर्य वाटेल. नागपूर आणि भोपाळचा सामना असाच अटीतटीचा झाला आणि जादा ५–५ मिनिटाच्या डावात सामन्याचे पारडे फिरले आणि भोपाळकर नशीबवान ठरले. विभागातच बाद झालेला भोपाळचा संघ चार संघ वर घेण्याच्या निर्णयाने भाग्यवान ठरला. उपांत्य फेरीत रूरकेला संघाचा त्याने पराभव केला. विभागीय सामन्यात चार लोणांनी रूरकेला संघाकडून मार खाणारा हा संघ त्या अनुभवाने अक्कलहुशारी शिकला आणि मोठ्या मानाने

अंतिम फेरीत दाखल झाला. भिलई पोलद संघ आणि सातारकरांचा उपांत्य सामना चांगलाच गाजला. कोपरारक्षक वसंत पावसकरने विनाकारण पकड घेण्याची केलेली घोडचूक सातारकरांना भोवली पण त्यामुळेच विजय जाधव आणि भाग्यवंत अहिरे याचा चढाईच्या खेळाचा मनमुराद आनंद प्रेक्षकांना लुटता आला. सातारकर कमनशिबवान हेच खरे कारण सामना हातात येता येता दोनदा त्यांच्या हातातून निसटला. मुख्य अडथळा उपांत्य फेरीतच दूर झाल्यावर भिलईकरांनी अंतिम फेरीत भोपाळच्या संघावर जवळ जवळ एकतर्फी मात केली. वर्मा आणि दादाराव हे त्यांचे विजयाचे शिल्पकार. भोपाळच्या डिन्हांने डाव सावरण्याचा केलेला प्रयत्न शेवटी निष्फळ ठरला.

महिला सामन्यांच्याबद्दल काय लिहावे ? एकतरी सामना खेळला जावा म्हणून मोठ्या मिनतवारीने नागपूरपर्यंत धावपळ करून नागपूरचा सुभाष मंडळाचा संघ शेवटच्या दिवशी शेवटच्या घटकेला आणविला गेला. तीन दिवस नुसताच मुक्काम करून कंटाळलेल्या नगर नागसेन नागपूर या संघाशी त्यांची लढत झाली. सुभाष मंडळाचा संघ बलाढ्य असूनही झुंज चांगली रंगली. पण खेळाबरोबरच योग्य वेळी लढवावयाच्या डावपेचात नगर नागसेनची सेना अपुरी पडली. राज्यक्रीडा-महोत्सव गाजविणाऱ्या शोभा कलांडे, जयश्री खापर्डे येथेही चमकून गेल्या. अवघा एक सामना खेळवून अखिल भारतीय अजिंक्य पदाची बिरुदावली मिळवण्याचे हे भाग्य विरळे.

संयोजक तळमळीचे होते, कष्टही घेत होते, पण तरीही कार्यक्षमतेचा आणि शिस्तबद्धतेचा अभाव लक्षात रहाण्याएवढा जाणवला. अंतिम सामन्याचा अपवाद वगळता प्रेक्षकांचा प्रतिसादही निरुत्साही करणाराच होता. विजयी संघाना दिलेल्या ढाली आणि बक्षिसे तर आपल्याकडे खेडेगावच्या सामन्यात देतात त्यापेक्षाही मामुली होती. वैयक्तिक पारितोषिकांचा जाहीर करूनही पत्ता नव्हता. भिलईचा कारखाना दाखविण्याची व्यवस्था करण्याचे राहूनच गेले. एक गोष्ट मात्र मला आवडली. उद्घाटन आणि बक्षिससमारंभाचे कार्यक्रम कसे पंधरा मिनिटात आटोपले गेले आणि दोन्ही वेळेस दोन्ही अध्यक्षांनी अध्यक्षीय भाषणाला पूर्ण फाटा दिला.

— एवढी अनुकरणीय प्रथा सोडली तर सामने कसे भरवू नयेत याबद्दल बरेच काही इतर ठिकाणी सामने आयोजित करणाऱ्या उत्साही मंडळींना या सामन्या-पासून शिकता येईल.

# आश्चर्य नंबर दहा !

आश्चर्य नंबर दहा ! हे प्रा. मधुकर तोरडमल यांचे नवीन नाटक चंद्रलेखा या नामवंत नाट्यसंस्थेने उत्कृष्ठ कलावंतांच्या संचामध्ये, निर्मितीची बाजू व्यवस्थित संभाळून सादर केले आहे. माणूस, आहे त्या परिस्थितीत सहसा समाधानी नसतो, व्यापाऱ्याला आपण कलावंत असावे असे वाटते, कलावंत खेळाडू होण्याची स्वप्ने पाहतो, निपुत्रिक पुत्रप्राप्तीसाठी असुसलेला असतो. आणि पोरांचा बाप, पोरे नसती तर बरे ! असे म्हणत असतो. मग असं हे कंटाळवाणे जीवन टाकून आपल्या आवडीचे नवजीवन प्राप्त झाले तर माणूस सुखी होईल का ? का या नवीन जीवनापेक्षा त्याला पहिले जीवन बरे वाटेल ? या प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न तोरडमल यांनी या आपल्या नवीन नाटकामध्ये केला आहे.

गजा, राजा व बाज्या हे तिघे मित्र, या ना त्या कारणाने प्रत्येकजण आहे त्या परिस्थितीमध्ये असंतुष्ट असतो. एका योगी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली राजा, आपले हे कंटाळवाणे आयुष्य लौकिक अर्थाने संपवतो, आणि नवीन जीवनाला उत्साहाने सुरुवात करतो. इतकेच नव्हे तर आपल्या दोन मित्रांनाही या नवजीवनाचे मार्गाने घेऊन जातो. योगी महाराजांचा हा मार्ग तसा सोपा असतो. आपले गिऱ्हाइक हेरायचे. तो मेल्याचा निश्चित पुरावा गोळा करून लौकिक अर्थाने सर्वांताला मारून टाकायचे, शस्त्रक्रियेचे सहाय्याने नंतर त्याच माणसामध्ये काही किरकोळ बदल घडवून आणायचे, आणि त्याला नवजीवन द्यायचे. जुन्या आयुष्याचे सर्व पाश तोडून, आपल्या आवडीने स्विकारलेले हे नवजीवन, यशस्वीपणे, आनंदाने सुरू करावे, एवढीच योगी महाराजांची अपेक्षा. परंतु गजा, राजा, बाजा, ही मंडळी – की जी अन्य चार चौघांसारखेच आहेत, आहे त्या आयुष्याला कंटाळलेली परंतु नवीन आपल्या निवडीचे आयुष्य मिळाल्यावर त्या नवीन जीवनाबाबत अनुत्साही आहेत. पहिल्या आयुष्याचे पाश ती तोडू शकत नाहीत. आणि अखेरीस योगीराजांना आपला हट्ट सोडून द्यावा लागतो. त्यांचे हे तिन्ही उमेदवार आपल्या पूर्वायुष्यात आनंदाने जातात.

सुखाचा शोध घेण्याची माणसाची प्रवृत्ती असली तरी आपल्या मर्यादांपलिकडे त्याची नजर गेली तर सुखाऐवजी अपयश पदरी येते. आहे त्यात सुख मानावे आणि येणाऱ्या संकटाला हिंमतीने तोंड द्यावे, असं काहीसं तोरडमल यांना या नाटकामध्ये सांगायचं आहे.

वेगळा विषय, आणि वेगळा आशय, ही तोरडमल यांच्या नाटकाची पूर्व परंपरा या नाटकाबाबतही कायम आहे. नाटकाचे दिग्दर्शन त्यांनी स्वत: केले असून प्रा. बाजीराव पळपुटे यांची महत्त्वपूर्ण भूमिका केली आहे. नाटकाची सुरुवात त्यांनी झकास केली. प्रा. बाजीराव पळपुटे यांच्या घरचे वातावरण – आज सर्वसाधारण समाजामध्ये जी परिस्थिती आढळते, त्याच्याशी जवळीक करणारे आहे. साधी-सोपी भाषा, चुरचुरीत संवाद यामुळे पहिल्या अंकाच्या प्रारंभी नाटक छान रंगते. 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकाच्या धर्तीवर नाटक सरकण्याची शक्यता वाटत असतानाच नवजीवनानें मोहीत झालेला आणि लौकीक अर्थाने मेलेला प्रा. बाजीरावांचा मित्र राजा येतो. राजा आणि बाज्या, या आपल्या मंडळींनाही नवजीवनाच्या कल्पनेत ओढतो आणि वास्तवतेच्या पातळीवरून चाललेले नाटक एकदम कल्पना रम्य पातळीवर उंच भरारी घेते. नाटकाचा पहिला अंक छान सोडला आहे.

लौकिक अर्थाने मेलेली ही मंडळी महाबळेश्वरला योगी महाराजांच्या आश्रमामध्ये दाखल होतात. पण नवजीवनास प्रारंभ करूनही पूर्वायुष्याचे पाश न सुटल्याने अनेक घोटाळे होतात. नाटक अखेरपर्यंत या कल्पना रम्य पातळीवरच हाताळले आहे. शेवटचा काही भाग मात्र पुन्हा अगदी ट्रॅडिशनल नाटकासारखा कन्व्हल्युझिव्ह केला आहे.

मराठीचे शब्दश: इंग्रजीत भाषांतर करणे, हलक्या प्रतीची भाषा वापरणे, यांचा विनोद निर्मितीसाठी उपयोग केला आहे. कित्येक वेळा तर बाजीरावच्या मुलाच्या तोंडी या वयाच्या मुलाच्या तोंडी आजकाल जी भाषा ऐकू येते ती घातली आहे. तसं हे सगळं खपून जातं पण समाधान देत नाही.

लेखनामध्ये काही दोष असले तरी सर्वसाधारणपणे प्रा. तोरडमल यांचं आगळ्या वेगळ्या विषयावरील हे नाटक मोठे मजेशीर वाटते – नारायण धारप यांच्या कादंबरीसारखे.

गणेश सोळंकी, स्वत: तोरडमल, दत्ता भट, आशालता वाबगावकर यासारखे मातब्बर कलावंत प्रयोग मोठा छान उभा करतात. एकमेकांना साथ देत नाटकाची रंगत वाढवतात. त्यातही गणेश सोळंकी आणि आशालता वाबगावकर, विशेष प्रभावी वाटतात. भावव्यक्तीच्या सामर्थ्याचे जे सुंदर दर्शन बाई दुसऱ्या अंकामध्ये घडवतात, त्याबद्दल त्यांना स्पेशल कॉम्लीमेंटस देणे आवश्यक वाटते. योगीराजाची अवघड भूमिका जनार्दन सोहनी तोलामोलात करतात. गजन जोशी यांचा जयंता लेखकाने जास्त संधी दिल्यामुळे असेल कदाचित – पण जरा जास्त आगावू वाटतो.

मराठी रंगभूमीवर अनेक प्रयोग चालू आहेत. तोरडमल यांचे हे नाटक प्रेक्षकांना आवडो न आवडो व्यवसायिक रंगभूमीवरील एक धाडसी प्रयोग असाच त्याचा उल्लेख करावा लागेल.

□ □ □

राष्ट्रीयीकरण केले. संस्थानिकांचे तनखे रद्द करण्यासाठी पार्लमेंटमध्ये घटना दुरुस्ती बिल आणले. या त्यांच्या धाडसी पावलांनी ही बाई समाजवादाच्या दिशेने प्रत्यक्ष काही तरी कृति करील अशी इंदिरा गांधींची प्रतिमा जनतेच्या मनात ठसली. त्यांना मिळालेल्या मोठ्या विजयाचे हे एक महत्वाचे कारण आहे. जनतेच्या मनात ठसलेली इंदिरा गांधींची ही प्रतिमा बरोबर की चूक हा प्रश्न निराळा पण अशी प्रतिमा निर्माण करण्यात त्यांनी मिळविलेले यश हेच त्यांच्या निवडणुकीतील प्रचंड यशाचे रहस्य आहे.

इंदिरा गांधींची जनतेच्या मनात ठसलेली प्रतिमा खोडून काढण्याचा आटोकाट प्रयत्न विरोधी पक्षांनी केला. इंदिरा गांधींची समाजवादाची व 'गरिबी' हटावची भाषा फसवी आहे. आपले पंतप्रधानपद टिकविणे एवढेच त्यांचे राजकारण आहे. कम्युनिस्ट, द्रवीड मुन्नेत्र कळघम, मुस्लीम लीग, अकाली दल यांच्या पाठिंब्याने त्या सत्तेवर टिकून आहेत, असा प्रचार विरोधी पक्षांनी केला पण त्याचा प्रभाव जनतेवर पडला नाही. प्रभाव पडला नाही याचा अर्थ त्या प्रचारातच तथ्य नव्हते असे नाही. बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे यासारख्या एक-दोन उपायांनी समाजवाद येत नाही. हे उपाय योजण्यात देखाव्याचाच भाग अधिक आहे. भाववाढ, वाढती बेकारी हे महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी इंदिरा सरकारने कोणतेही परिणामकारक उपाय योजलेले नाहीत. अर्थव्यवस्थेवर बड्या उद्योगपतींची पकड कायम आहे. बँक राष्ट्रीयीकरणाचा फायदा सधन शेतकऱ्यांनाच अधिक आहे. जमीन सुधारणांची परिणामकारक अंमलबजावणी अजूनही झालेली नाही ही वस्तुस्थिती जेवढ्या परिणामकारकपणे जनतेपुढे मांडली जावयास हवी होती तेवढी मांडली गेली नाही. त्यामुळे इंदिरा गांधींची जनमानसात ठसलेली प्रतिमा खोडून काढण्यात विरोधी पक्षांना यश आले नाही.

इंदिरा गांधींची कम्युनिस्ट, मुस्लीम लीग, द्रवीड मुन्नेत्र कळघम व अकाली दलाशी युती आहे. या प्रचारावर विरोधी पक्षांनी वाजवीपेक्षा अधिक भर दिल्याने त्याचा उलटाच परिणाम झाला. इंदिरा गांधींना या पक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून रहावे लागू नये याशाठी त्यांना आपण भरघोस बहुमताने निवडून दिले पाहिजे, असा प्रचार इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी केला तो जनतेस अधिक पटला व त्यांनी इंदिरा काँग्रेसला लोकसभेत घवघवीत बहुमत मिळवून दिले.

इंदिरा विजयाचे आणि विरोधी पक्षांच्या अपयशाचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे १९६७ च्या निवडणुकीनंतर बिगर काँग्रेस पक्षांनी संयुक्त आघाड्या करून स्थापलेल्या सरकारांना आलेले अपयश. काँग्रेसपेक्षा अधिक सुधारलेला कार-

भार ही सरकारे देऊ शकली नाहीत. आपसातील झगडे मिटवून सत्ता कशीबशी टिकविण्याच्या डावपेचातच त्यांचा सारा वेळ जाऊ लागला. संयुक्त आघाड्यांच्या सरकारांबद्दल जनतेच्या मनात त्यामुळे प्रतिकूल प्रतिक्रिया निर्माण झाली. विरोधी पक्षांना मते देऊन अशी अस्थिर सरकारे निर्माण करण्यापेक्षा नवकाँग्रेसलाच मोठ्या बहुमताने निवडून देऊन स्थिर सरकार आणलेले बरे, असे सर्वसामान्य जनतेला वाटले असेल तर ते स्वाभाविक आहे. आघाड्यांची सरकारे अयशस्वी झाली याचा दोष उजव्या व डाव्या दोन्ही बाजूंच्या पक्षांवर येतो.

संयुक्त आघाड्यांच्या या अपयशामुळेच सिंडिकेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या चार पक्षांच्या आघाडीबद्दल जनतेला आकर्षण वाटले नाही. या आघाडीला निवडणुकीपूर्वी किमान संयुक्त कार्यक्रमही तयार करता आला नाही. जागा वाटपाबाबतही त्यांच्यात मतभेद झाले. आताच एवढी भांडणे तर सत्ता हाती आल्यावर काय होईल. असे या आघाडीबद्दल जनतेला वाटले असेल तर ते स्वाभाविक आहे.

उजव्यांचे प्रभुत्व असलेल्या या आघाडीत संयुक्त समाजवादी पक्षाने सामील व्हावे हेही जनतेला पटले नाही. आघाडीने त्या पक्षाचे वजन वाढण्याऐवजी उलट घटले. मधु लिमये यांच्यासारखे मोठे नेतेही यावेळी निवडणूक हरले याचे एक महत्त्वाचे कारण पक्षाचे हे धोरण !

डाव्यांची आघाडी या निवडणुकीत नव्हतीच. इंदिरा गांधींना आपल्या पाठिंब्या-

---

# व्होल्गा जेव्हा लाल होते

## ले. : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये


राजहंस प्रकाशन

---

वर अवलंबून रहावे लागले व त्या आपल्याशी राष्ट्रीय पातळीवर आघाडी करतील असे कम्युनिस्ट व प्रजासमाजवाद्यांना वाटत होते. आधीपासून डाव्यांची आघाडी उभारण्याचे प्रयत्न कोणी केलेच नाहीत, कम्युनिस्टांनी तर उजव्या आघाडीची धास्ती अधिक घेतली होती व उजव्या आघाडीला पाडण्यासाठी इंदिरा काँग्रेसला त्यांचा सर्वसाधारण पाठिंबा होता. यामुळे नव्या लोकसभेत डाव्यांचेही बळ घटले. डाव्या पक्षांचे नेतेच याला जबाबदार आहेत.

इंदिरा गांधींनी दणदणीत विजय मिळविला. बहुमतासाठी त्यांना आता इतर पक्षांवर अवलंबून रहावे लागणार नसल्याने आपली धोरणे व कार्यक्रम अंमलात आणण्यास त्या आता पूर्ण मोकळ्या आहेत पण समाजवादी कार्यक्रम अंमलात आणण्यात त्या यशस्वी होतील असे वाटत नाही. केवळ निवडणुका जिंकून समाजवाद येत नाही. समाजवाद आणण्याचे पार्लमेंट हे फक्त एक मर्यादित साधन आहे. पार्लमेंट कायदे करील पण त्याची अंमलबजावणी नीट होणार नसेल तर समाजवाद कागदावर आणि पुढाऱ्यांच्या भाषणातच राहील, समाजवादी कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी त्यासाठी वाहून घेतलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची संघटना आवश्यक आहे. अशी संघटना उभारण्यासाठी आवश्यक असणारे नेतृत्वाचे गुण पंडित नेहरूंमध्ये नव्हते व त्यांच्या कन्येपाशीही नाहीत.

इंदिरा गांधींबद्दल जनतेचा भ्रमनिरास होण्यास काही काळ जावा लागेल. तोपर्यंत त्या अधिकारावर राहतील. दरम्यान विरोधी पक्षांनी पराभवाने न खचता अन्यायाविरुद्ध जन आंदोलने संघटित करण्याच्या कार्यावर आता अधिक भर दिला पाहिजे आणि डाव्याउजव्यांच्या सरमिसळ आघाडीचा अयशस्वी प्रयोग सोडून दिला पाहिजे. सर्व विरोधी पक्षांचे काही प्रश्नांवर सहकार्य होऊ शकेल पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित राहिले पाहिजे. विधायक कार्य आणि जनआंदोलने या कार्यक्रमावर विरोधी पक्षांनी आता भर दिला तर त्यातूनच त्यांचे बळ वाढेल व ते टिकाऊ स्वरूपाचे असेल. यातूनच देशाच्या राजकारणाला निकोप वळण लागण्याची शक्यता आहे.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

ब. मो. पुरंदरे

किंमत
प्रत्येकी
रुपये तीन

राजहंस प्रकाशन
पुणे.